१०३ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

• पुणे, सोमवार ४ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३१८, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 318, Marathi - Daily - Pune, 4 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## पीओपी मूर्तीवर लाल रंगाचे चिन्ह बंधनकारक

**मुंबई** - प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) वापरून बनवलेल्या गणेश मूर्तींसह अन्य मूर्तींच्या विक्री आणि विसर्जन प्रक्रियेसाठी राज्य शासनाने सुधारित व एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यानुसार, आता पीओपी मूर्ती उत्पादक आणि विक्रेत्यांना प्रत्येक मूर्तीवर लाल रंगाचे गोल चिन्ह लावणे बंधनकारक असेल. तसेच, मूर्तींची विक्री नोंदवही ठेवावी लागणार आहे. ग्राहकांना मूर्तीच्या विसर्जन प्रक्रियेबाबत माहिती देणारी पत्रक (इन्फॉर्मेशन पँप्लेट) देणेही आवश्यक ठरणार आहे. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी हे नियम कठोरपणे अंमलात आणले जाणार आहेत.



## पुण्यात कर्नल पुरोहित यांचे शोभायात्रा काढून जंगी स्वागत




**कर्नल प्रसाद पुरोहित यांची २००८ मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातून १७ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता झाली. त्यानंतर आज पहिल्यांदाच ते त्यांच्या पुण्यातील निवासस्थानी दाखल झाले. या ठिकाणी शोभायात्रा काढून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.**

■ पुणे

**या** शोभायात्रेत शहरातील काही संघटना सहभागी झाल्या होत्या. पुण्यातील लॉ कॉलेज मार्गावर कर्नल पुरोहित यांचे निवासस्थान आहे. या मार्गाच्या सुरुवातीपासून त्यांच्या घरापर्यंत ही शोभायात्रा काढली होती. पुरोहित यांनी मिरवणुकीवेळी डोक्यावर भगवा फेटा बांधला होता. त्यांच्या स्वागताच्या गाडीला दोन्ही बाजूने तिरंगा झेंडा लावलेला होता. या शोभायात्रेत ढोल-ताशांचा गजर आणि चहुबाजूंनी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव सुरू होता. यावेळी स्थानिकांकडून पुष्प गुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. जय भवानी जय शिवाजी आणि हर हर महादेव अशा घोषणाही उपस्थितांनी दिल्या. 'वेलकम होम काका' असा मजकूर लिहिलेले पोस्टर या मिरवणुकीत झळकत होते. कर्नल पुरोहित यांनी भावना व्यक्त केल्या की, मी ज्या सोसायटीत राहतो ते माझे कुटुंब आहे. येथील लोकांनी मला लहानपणापासून » पान ७ वर

# ट्रम्पने चिडून भारतावर कर लावताच रशियाकडून तेल खरेदी थांबवली?

**रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धात अमेरिका व्यापारी विचार करून रशियाला विरोध करीत त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी रशियाकडून तेल विकत घेऊ नका असे त्यांनी भारताला सांगितले, पण भारताने ऐकले नाही. त्यावर संतापून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर घसघशीत २५ टक्के आयातकर लावला. यामुळे अस्वस्थ होऊन भारताने अखेर रशियाकडून तेल आणि लष्करी सामग्री खरेदी बंद केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः ही माहिती जाहीर केली. भारताने यावर अद्याप उत्तर दिलेले नाही.**



■ नवी दिल्ली

ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की, माझ्या माहितीनुसार भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही. मी तसे ऐकले आहे. हे खरे आहे की नाही, हे मला माहीत नाही, पण हे एक चांगले पाऊल आहे. रॉयटर्स या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, भारतातील सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्यांनी गेल्या आठवड्यापासून रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी थांबवली आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि मेंगलोर रिफायनरी अँड पेट्रोकेमिकल्स या चारही सरकारी कंपन्यांनी गेल्या आठवड्यात रशियाकडून कोणतीही नवीन तेल खरेदी केली नाही. एवढेच नव्हे तर भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी रशियन टँकरना भारतात तेल उतरवण्यास मनाई केली आहे. तेलाचे किमान चार रशियन टँकर गुजरातच्या जामनगरजवळ समुद्रात थांबले होते. परंतु भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी हे तेल स्वीकारण्यास नकार दिला आहे. तेल स्वीकारायचे की नाही याबाबतच्या सरकारी आदेशाची या कंपन्या वाट पाहत आहेत. मात्र याबाबतीत संबंधित कंपन्यांकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांना रशियाकडून तेल खरेदीबद्दल प्रश्न विचारला असता मोघम उत्तर देत ते म्हणाले, इंधन खरेदीच्या गरजांबाबत आमचा दृष्टिकोन अत्यंत स्पष्ट आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काय उपलब्ध आहे, कोणत्या दराने ते मिळत आहे आणि जागतिक परिस्थिती काय आहे याचा विचार करून आम्ही निर्णय घेत आहोत. भारतीय तेल कंपन्यांनी रशियन तेलाची आयात थांबवल्याच्या बाबतीत आम्हाला कोणतीही विशिष्ट माहिती नाही. कोणत्याही देशासोबतचे आमचे संबंध गुणवत्तेवर आधारित आहे .

पाश्चिमात्य देशांनी रशियावर निर्बंध लादल्यानंतर रशियन तेलाच्या किमती कमी झाल्या. त्याचा फायदा घेत भारताने रशियाकडून अधिक प्रमाणात तेल खरेदी सुरू केली होती. भारत रशियाकडून आपल्या गरजेच्या सुमारे ३५ टक्के जास्त म्हणजे दररोज २ लाख लिटरहून अधिक तेल रशियाकडून घेत होता. जानेवारी ते जून २०२५ या सहामाहीत भारताने दररोज १.७५ दशलक्ष बॅरल तेल आयात केले.

युक्रेनने रशियाविरूध्द उठाव करून स्वातंत्र्यासाठी युद्ध छेडले. त्याबरोबर खनिजाने समृद्ध असा युक्रेन आपल्या काबूत आणावा यासाठी अमेरिकेने युक्रेनला मदत करण्यास सुरुवात केली. शेवटी युक्रेनवर दबाव आणून अमेरिकेने त्यांच्या खनिजावर ताबा मिळवणारा करार » पान ७ वर

## प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर असलेला मराठा समाज मागासलेला कसा?

### याचिकाकर्त्यांचा हायकोर्टात सवाल

■ मुंबई

**प्रत्येक** क्षेत्रात मराठा समाज अग्रेसर असताना मराठा समाज मागासलेला कसा असू शकतो? असा सवाल याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात उपस्थित केला. मराठा समाजाला दिलेल्या १० टक्के आरक्षणामुळे सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची घालून दिलेली ५० टक्के मर्यादा ओलांडली असल्याचे मत याचिकाकर्त्यांना यावेळी मांडले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० ऑगस्ट रोजी होणार आहे.

मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात आरक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारने एसईबीसी कायदा तयार केला आहे. या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे,तर मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठीही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी न्या. रवींद्र घुगे, न्या. निजामुद्दीन जमादार आणि न्या. संदीप मारणे यांच्या त्रिसदस्यीय पूर्णपीठाची स्थापना करण्यात आली असून, या पूर्णपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की, सर्वच क्षेत्रात मराठा पुढे आहेत. अर्धवट सर्वेक्षणाच्या आधारावर मराठ्यांना आरक्षण देण्यात आले आहे.

## काळाचौकीच्या महागणपतीसह मुंबईतील गणेशमूर्तींचे आगमन

■ मुंबई

**राज्यभरात** गणेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली असून, मुंबईतील सार्वजनिक मंडळांच्या गणेशमुर्तीचे आगमन व्हायला सुरुवात झाली आहे. आज काळाचौकीच्या महागणपतीसह काही गणेशमूर्तीचा आगमन सोहळा वाजतगाजत पार पडला.

१९५६ मध्ये स्थापना झालेल्या काळाचौकीच्या महागणपतीची मिरवणूक परळ वर्कशॉपपासून सुरू होऊन लालबाग मार्केटमार्गे काळाचौकीपर्यंत ढोल-ताशांच्या गजरात निघाली. यावेळी शेकडो गणेशभक्त उपस्थित होते. या मिरवणुकीत शंखनाद, दहीहंडी पथकाची सलामी आणि पहिल्यांदाच महागंगा आरती करण्यात आली. मुंबईचा मोरया, कुर्ल्याचा महाराजा, फोर्टचा राजा, धारावीचा सुखकर्ता, आणि परळचा मोरया या मंडळांच्या गणेशमूर्तींच्या मिरवणुकाही आज निघाल्या. तर चिंचपोकळी येथील उदय खातू यांच्या कारखान्यातून कोल्हापूरच्या चिंतामणीचे कोल्हापूरकडे प्रस्थान झाले.

## सरकारचा पैसा! आपल्या बापाचे काय जाते? तंबीनंतरही शिरसाटांचे वक्तव्य

■ अकोला

**सरकारचा** पैसा आहे, आपल्या बापाचे काय जाते? असे वादग्रस्त वक्तव्य सामाजिक न्याय मंत्री आणि शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील मंत्र्यांना वादग्रस्त वक्तव्य न करण्याची तंबी दिली होती. तरीही मंत्री शिरसाट यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान करून शिंदेंना अडचणीत आणले आहे.

अकोला शहरातील निमवाडी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या नूतन वास्तूचे लोकार्पण संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते



म्हणाले की, आपल्या भागातील वसतिगृहासाठी निधीची मागणी करा. वसतिगृहाला पाच, दहा, पंधरा कोटींचा निधी लागत असेल तरी तो मागा. नाही दिला तर नाव सांगणार नाही. सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचे काय जाते. शिंदे गटातील काही मंत्र्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे ते वारंवार अडचणीत सापडत आहेत. काही दिवसांपूर्वी शिरसाट यांचा पैशांच्या बॅगेसोबतचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्याआधी हॉटेल खरेदी प्रकरणात ते वादात अडकले. त्यांच्या वक्तव्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. अशा बेताल मंत्र्यांना किती दिवस अभय देणार असा सवाल उबाठा प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी केला.

## जम्मू-काश्मीरच्या कुलगामात चकमकीत ३ दहशतवादी ठार

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरच्या** कुलगाम येथे झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले आहेत. यातील एक जण लष्कराच्या हिटलिस्टवर होता. ही कारवाई तब्बल तीन दिवस सुरू होती. या जंगलात अद्याप काही दहशतवादी लपले असल्याची माहिती सुरक्षा दलाने दिली आहे.

सुरक्षादलाने काल जंगलात लपलेल्या दोन दहशतवाद्यांना ठार केले तर आज सकाळी एका दहशतवाद्याला ठार केले होते. हरिस नजीर असे त्याचे नाव असून, तो लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी होता. हरिस हा पुलवामा येथील कच्चीपोरा इथे राहणारा होता. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलाने जारी केलेल्या चौदा दहशतवाद्यांच्या यादीतही त्याचे नाव होते. या कारवाईत एक लष्करी अधिकारीही जखमी झाला आहे. त्याला श्रीनगरच्या लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सैन्यदलाने ड्रोनच्या सहाय्याने या तिघांचेही मृतदेह जंगलात असल्याची खात्री केली आहे.

## दादरचा कबुतरखाना अखेर बंद कारवाईनंतर जैन समाजाचे आंदोलन

### गुन्हा दाखल करण्याचा इशारा

■ मुंबई

**दादर** रेल्वे स्थानकाच्या काही अंतरावर असणारा प्रसिद्ध कबुतखाना अखेर मुंबई महापालिकेने बंद केला आहे. कबुतरांच्या विष्ठेतील जीवाणूंमुळे श्वसनाचे विकार आणि इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असल्याच्या कारणावरून राज्य सरकारने महापालिकेला कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने देखील कबुतरखान्यांवर कठोर पावले उचलण्याचे आदेश दिले.



त्यानंतर महापालिकेकडून दादरमधील प्रसिद्ध असा कबुतरखाना बंद करण्यात आला. याच मुद्यावरून आता जैन समाज आक्रमक झाला आहे. त्यांनी याविरोधात आज दादरमध्ये आंदोलन केले.

शुक्रवार १ ऑगस्टला रात्री महापालिकेचे पथक कारवाईसाठी कबुतरखान्यावर गेले असता स्थानिक नागरिक आणि जैन » पान ७ वर

## इंडियाची ७ ऑगस्टला राहुल गांधींच्या घरी बैठक

■ नवी दिल्ली

बिहारमधील मतदारयादी पुनर्पडताळणी, अमेरिकेबरोबरच्या संबंधांमध्ये सरकारला आलेले अपयश, बिहार, पश्चिम बंगाल व महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीची महत्त्वाची बैठक ७ ऑगस्टला विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी होणार आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीचा पराभव झाला होता. त्यानंतर झालेल्या दिल्ली » पान ७ वर

## पनवेलच्या नाईट रायडर बारवर मनसेचा रात्री खळफट्याक

■ पनवेल

**मनसे** अध्यक्ष राज ठाकरे यांनी शेकाप मेळाव्यात भाषण करताना रायगड जिल्ह्यातील डान्स बारवर कडाडून आक्षेप घेतला. त्यानंतर अवघ्या काही तासांत पनवेलजवळील कोन गावातील नाईट रायडर बारवर काल मध्यरात्री १२ च्या सुमारास मनसे कार्यकर्त्यांनी खळफट्याक करत तोडफोड केली. या प्रकरणी पनवेल विभागाचे मनसे नेते योगेश चिले यांच्यासह १५ कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे म्हणाले, राज ठाकरे जेव्हा एखादा मुद्दा मांडतात तेव्हा महाराष्ट्र सैनिक त्याची अंमलबजावणी करतात. अनधिकृत बार सरकारने तोडायला पाहिजे, म्हणजे मनसेला तोडफोड करायची गरज पडणार नाही. सरकार नेमके काय करत आहे? सरकारच डान्स बार चालवत आहे का, असा प्रश्न आता उभा राहतो. यावेळी संदीप देशपांडे यांनी घातलेल्या 'हिंदू आहोत, हिंदी नाही' अशा मजकुराच्या टी-शर्टनेही विशेष लक्ष वेधले.

## मेघना बोर्डीकर पुन्हा वादात ग्रामसेवकाला मारण्याची भाषा

■ परभणी

**राज्यमंत्री** आणि परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर पुन्हा एकदा वादात अडकल्या आहेत. त्यांनी जिंतूर तालुक्यातील बोरी येथे ग्रामविकास अधिकाऱ्यास भर सभेत कानाखाली मारण्याची आणि जागेवर बडतर्फ करण्याची भाषा वापरली. या घटनेचा व्हिडिओ राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट केला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्र्यांना आवरण्याची विनंती केली आहे.

मागच्या आठवड्यात पुसद येथे मेघना बोर्डीकर साकोरे असे नाव लिहिलेला ट्रक जप्त करण्यात आला होता. त्यानंतर तो नातेवाईकाचा असून, त्यातील मुद्देमाल वैध असल्याची सावरासावर त्यांनी केली होती. ही घटना ताजी असतानाच बोर्डीकर भरसभेत ग्रामसेवकाला उद्देशून म्हणाल्या की, असे कुणाचे सालगडी सारखे काम केले तर याद राख. कानाखाली मारीन. पगार कोण देत आहे? आताच्या आता बडतर्फ करीन. चमचेगिरी कोणाची करायची नाही, याद राखा, तू काय कारभार करतो हे मला माहीत नाही का? हमाली



करायची असेल तर नोकरी सोड.

याचा व्हिडिओ पोस्ट करून रोहित पवार म्हणाले की, घरकूल लाभार्थ्यांना कार्यक्रमात न आणल्याबद्दल भरसभेत अधिकाऱ्याला कानाखाली मारण्याची धमकी मंत्री कोणत्या अधिकारात देऊ शकतात? देवेंद्र फडणवीससाहेब आपण काय सज्जन मंत्री शोधले आहेत? तुमच्या मंत्रिमंडळाची तर इज्जत जाते, पण यापेक्षाही महाराष्ट्राची बेअब्रू होते आहे. कृपया यांना » पान ७ वर

## खा. निशिकांत दुबेंचे मुंबईत स्वागत करणार

### फडणवीसांचे वक्तव्य

■ मुंबई

**मराठी** माणसाविरोधात सातत्याने गरळ ओकणारे भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या विधानांवरून वाद पेटला असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुबे यांच्या मुंबई दौऱ्यात त्यांच्याशी गैरवर्तन होऊ देणार नाही. महाराष्ट्रात त्यांचे स्वागत करू, असे वक्तव्य केले आहे. त्यावरून नवा वाद होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात हिंदी विरुद्ध मराठी वाद शिगेला पोहोचलेला असताना भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी हिंदी भाषेवरून 'पटक पटक के मारेंगे' अशा शब्दांत मराठी माणसाला आव्हान दिले होते. त्यानंतर मनसे प्रमुख राज ठाकरेंनी दुबे यांच्या विधानावर मुंबईला या, 'मुंबई के समंदर में डुबो-डुबो कर मारेंगे,' असे म्हटले होते. याबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, दुबे काय म्हणाले ते मी पाहिले नाही. पण त्यांनी असे काही बोलणे चुकीचे आहे. आपण सर्वजण कुठे चाललो आहोत? आपण इतके संकुचित कसे होत आहोत? हे सर्व राजकारण आहे. मराठी माणूस मराठीसाठी » पान ७ वर

## गंगा खोऱ्यात मुसळधार पाऊस पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत

■ वाराणसी

**गंगेच्या** खोऱ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे उत्तर प्रदेश व बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. गंगा, यमुना आणि त्यांच्या उपनद्यांची पाणीपातळी वाढल्यामुळे संपूर्ण गंगाकाठ भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथक बचावकार्य करत आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी नेऊन पूरग्रस्तांसाठी तात्पुरती निवासस्थाने आणि मदत छावण्या उभारण्यात




आल्या आहेत. प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत.

उत्तर प्रदेशातील प्रयागराज, मिर्झापूर, वाराणसी, गाझीपूर आणि बलिया जिल्ह्यांसह बिहारमधील बक्सर, भोजपूर, सारण, पटणा, वैशाली, समस्तीपूर, बेगूसराय, खगडिया आणि भागलपूर या जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला. गंगा » पान ७ वर

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इलेक्ट्रीक कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 12000/- ते 21000/- गाडीभाडे मिळेल. **9820432870 / 9819017461** {NC251768}

नविन हॉस्पिटलकरिता हाऊसकिपिंग महिला व पुरुष पाहिजेत. सुरज वॉटर पार्कजवळ ठाणे (वेस्ट), **8180091545 / 9270429106** {NC251803}

पाहिजे सिक्युरीटी गार्ड, हाऊसकिपिंग व बाऊन्सर. संपर्क करा - **9619115448** {NC251776}

सिक्युरिटी गार्ड/ हाऊसकिपींग, जेन्ट्स, लेडीज पाहिजेत. सायन, दादर, वरळी, गोवंडी, मालाड, चुनाभट्टी लोअर परेल. **8291056761/ 8422880515/ 8422880514** {NC251671}

सीडी मशीनसाठी प्रिंटर फिडरमन, बॉयलर, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, कटर पाहिजेत. संपर्क : **9820930362 / 9930589715** {NC251697}

बोरीवली पूर्वमध्ये इमिटेशन ज्वेलरीच्या कंपनीत डायमंड चिटकवायला मुली पाहिजेत. पगार योग्यतेनुसार. वय 35 पर्यंत संपर्क : कार्टररोड नंबर-2, शताब्दी हॉस्पिटलजवळ स्टेशनपासून 5 मिनिटांवर, बोरिवली (पूर्व) **7977369456** (वेळ - 10.00- 6.00) {NC251668}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये लेडी प्यून पाहिजे. वय 30 पर्यंत, शिक्षण 10वी, वेळ - (9.30 - 6.30) पगार (8000-9000) परमनंट जॉब. ॲडव्होकेट जैन - **9820113939** {NC251767}

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

## पाहिजेत

दादर येथील संस्थेला रात्री 8 ते सकाळी 8 या वेळेसाठी वॉचमन हवा आहे. पत्ता :- ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, बाळ गोविंददास रोड, लक्ष्मीनारायण बाग हॉलसमोर, माहिम, मुंबई - 400016. संपर्क - **9869352134** {NC251771}

वसई पूर्व (तुंगारफाटा) स्थित फॅक्टरीसाठी ऑफिस असिस्टंट पाहिजेत. शिक्षण बारावी पास. पगार 13,000/- ते 15,000/- वेळ 8.30 ते 7 pm **8698522629 / 8605233061** {NC251782}

इमिटेशन ज्वेलरी शोरूमसाठी सेल्स गर्ल आणि पॅकिंगसाठी मुलगी पाहिजे.-झवेरी बाजार- **9820392333.** {NC251825}

घाटकोपरमध्ये मॅटर्निटी हॉस्पिटलसाठी अनुभवी आया मावशी व नर्सेस पाहिजेत. **9920873044** {NC251826}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी/टीचर/ गृहिणी पाहिजेत. पगार+ पीएफ. **9670731420** {NC251828}

कुरिअर कंपनीमध्ये पिकअप व डिलिव्हरीसाठी त्वरीत मुले पाहिजेत. ठिकाण-फोर्ट, दादर, लोअरपरेल, वडाळा, नवीमुंबई. दररोज रोख 600 + प्रवास खर्च. Speedman Express 191-B, 9th Cavel Cross Lane, 1st Floor, Dr. Viegas Street, Near Barretto High School, Chirabazar, Mumbai - 400002. Note - फोन न करता ऑफिसमध्ये येणे. {NC251577}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

ठाणे, भिवंडी, वाशी, पनवेल, मुलुंड याठिकाणी ड्रायव्हर पाहिजेत पगार 16,000/- (टी.आर लायसेन्स आवश्यक) आणि तसेच मारुती इको कार्गो/ टाटा एस/ टाटा ४०७/ टाटा ७०९/ आयशर या मॉडेलच्या वाहनांची आवश्यकता आहे. संपर्कः **8655344090/ 9029824131** {NC251625}

## पाहिजेत

सिक्युरिटी हाऊसकीपिंग कंपनीला- सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, BDM, अकाउंट, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड / सुपरवायजर हाऊसकीपिंग मुले/ मुली पाहिजेत - **9223380568/ 69** {NC251649}

मॉलमध्ये / पॅकिंगमध्ये मुले/मुली अर्जंट पाहिजेत. पगार 15,000/- - 18,000/- **(9702640118)** {NC251732}

बोरिवली मध्ये पेस्टकंट्रोल कामासाठी अनुभवी मुले पाहिजेत. मो. **9820330717** {NC251839}

पालघर येथील इंजिनीअरिंग कंपनीला त्वरित लेथ ऑपरेटरची आवश्यकता आहे, 1-2 वर्षाचा अनुभव असणाऱ्या गरजू उमेदवारांनी संपर्क साधा - **9004584894 / 93729 49695** {NC251841}

ठाण्यातील प्रा. लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास ३० मुले / मुली कायमस्वरुपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000 - 45000/- **7021534944/ 9819778053** {NC251842}

## Situation Vacant

REQ Female for our Godown at Rabale, Navi Mumbai. B.Sc. passed (with Chemistry) having Min Exp of 2 yrs in the said Field. Residing from Badlapur to CSMT & Digha to Panvel pref. Walk-in: Matangi, Thane (W) - Mob. **7400181025,** Email: sales@matangioffice.com {NC251789}

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

## कर्जविषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्डवर लोन मिळवा चार दिवसांत. संपर्कः **8450983443.** {NC251829}

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**




१९४०-४५ चा काळ होता, रम्य अशा दिवसातली ती सकाळची वेळ होती, संगीकार नौशादजी आपल्या आशियाना या घरात हार्मोनियमवर गाण्याचे स्वर काळ्या पांढरीच्या शृंगारात बसवत होते. इतक्यात त्यांच्या दारावर थाप पडली. पाठोपाठ आणखी थापा पडल्या. डोअर बेल न वाजवता दारावर कोण सलग थापा मारतंय हे बघण्यासाठी त्यांनी दरवाजा उघडला आणि समोर कोणीच नव्हते, ते दार बंद करणार इतक्यात बाजूला लपलेली एक १२- १३ वर्षांची धिटूकली समोर आली. तिने त्यांच्या पायाला मिठीच मारली ! ते तिच्याशी बोलण्याआधी तिने भोकाड पसरले, ते तिला घरात घेऊन आले. तिची विचारपूस केली तेंव्हा ती बोलती झाली.

## कृष्णधवल सिनेमा काळातील ज्येष्ठ नटी व गायिका

# उमादेवी खत्री उर्फ टूनटून

संजीव वेलणकर पुणे

ती म्हणाली, मला तुम्ही गायनाची संधी दिली नाही तर मी इथल्याच समुद्रात जीव देईन ! गावात असताना रेडीओवर गाणी ऐकून ऐकून तिने एकलव्यी बाण्याने रियाझ केलेला, इतकीच काय ती तिची गायनाची तयारी पण तिचा आवाज मधुर असल्याने तिचा स्वतःवर विश्वास होता अन तिच्या डोक्यात





सतत नौशादजींचे वेड असे. या शिदोरीवर तिने घर सोडून वयाच्या १३ व्या वर्षी थेट मुंबई गाठली होती. नौशाददेखील युपीच्या लखनौचेच असल्यामुळे त्यांना तिची काळजीही वाटत होती. नौशादजीनी तिच्या अशा या पार्श्वभूमीमुळे काही दिवस काम दिले नाही अन एके दिवशी तिची ऑडीशन घेतली आणि ते अचंबित झाले ! या मुलीचे नाव उमा देवी होय ....गाण्याचे वेड डोक्यात घेऊन आलेल्या उमादेवीच्या आयुष्यात पुढे अनेक चढउतार येऊन ती एक हसण्याजोगी बाब होणार आहे याचा तिला तिळमात्र अंदाज नव्हता ...

त्या दिवशी नौशादजींनी तिला ऐकले अन तिला पार्श्वगायनासाठी तत्काळ निवडले. तिची वर्णी इतरत्र लागू नये म्हणून नौशादजींनी ए. आर. कारदार यांना गळ घातली, नौशाद म्हणजे त्या काळाचे सर्वात मोठे संगीतकार असल्याने त्यांचा शब्द डावलणे अशक्य होते. तत्काळ उमादेवीची निवड शैलीदार सोनेरी आवाजाची गायिका म्हणून ए. आर. कारदार प्रॉडक्शन हाऊससाठी झाली, तिच्याशी करार केला गेला, तिचे मासिक वेतन ५०० रुपये ठरवले गेले. पण एक अट होती तिने ३ वर्षे दुसरया प्रॉडक्शन हाऊससाठी गायचे नाही. त्यांना गाण्यासाठी लगेच सिनेमे मिळाले दर्द, दिल्लगी, चांदनी रात, नाटक पैकी 'दर्द' मधील शकील बदायुनी यांनी लिहिलेलं 'अफसाना लिख रही हुं' ने तिला रातोरात प्रसिद्धीच्या झोतात आणले सुरैयाबरोबरचे 'बेताब है दिले दर्द' ने तिला आणखी प्रसिद्धी मिळाली. दर्द नंतर मेहबूब खानच्या 'अनोखी अदा' मधलं 'काहे जिया डोले ..' आणि 'दिल को लगाके हमने कुछ भी न हमने पाया..'हे गाणंही हिट झालं. पण उमादेवी मात्र करारात बांधल्या गेल्या असल्यामुळे इतर संधींना मुकत गेल्या अन त्यांना हळूहळू गायकीसाठी इतर प्रॉडक्शन हाऊसची दारे जवळजवळ बंद झाली अन तिचे करारबद्ध प्रॉडक्शन हाऊसच शेवटी बंद पडले. अन उमा देवी गायिकेच्या भूमिकेतून स्ट्रगलरच्या फेऱ्यात अडकली. त्या कामासाठी फिरू लागल्या. त्या गव्हाळ वर्णाच्या, थोडीशी जाड अंगाची, किंचित बसक्या चणीची होत्या, दिसायला लाखात एक वगैरे अशी काही नव्हत्या पण ती अगदी जेमतेम सौंदर्यवती होती अशी बाब होती. गायकीत नाव झाले तरी हरकत नाही पण अपयशाचा शिक्का घेऊन गावाकडे तिला परत जायचे नव्हते. त्यामुळे गाण्यातील संधींनी तोंड फिरवल्यामुळे तिने अभिनयासाठी प्रयत्न सुरु केले, एखादा रोल मिळतो का यासाठी ती वेगवेगळ्या प्रॉडक्शन हाऊसचे उंबरठे झिझवू लागल्या. त्याचा गायकीचा प्रवास थांबला, नायिका होण्याचे स्वप्न भंगले अन ती बॉलीवूडची पहिली महिला कॉमेडीयन म्हणून नावारूपाला आली. १९५० मध्ये नौशाद यांचीच निर्मिती असलेला बाबुल हा सिनेमा सेट वर आला. या सिनेमातील नर्गिसच्या मैत्रिणीच्या - मुन्शीजीच्या मुलीच्या विनोदी भूमिकेसाठी तिला विचारणा झाली प्रेक्षकांनी या सिनेमातील उमादेवीच्या पात्रावरही प्रचंड कौतुकाचा वर्षाव केला, या पात्राचं नाव होतं टूनटून! हे नाव पुढे उमादेवीला आयुष्यभर चिकटले. त्यांची गायिका ही मूळ ओळख या सिनेमाने पुसून काढली अन टूनटून हे नाव जन्मास आले. जॉनी वॉकर, मेहमूद, धुमाळ, आगा, मुक्री, केष्टो मुखर्जी, भगवानदादा अशा अनेक कॉमेडीयन्स सोबत त्यांनी सिनेमे केले पण कधी कुणाशी नाव जोडू दिले नाही. टूनटून यांचा समाजावर इतका प्रभाव पडला की टूनटून या शब्दाचा अर्थच जाडी मुलगी असा होऊन गेला. टूनटूनने केलेल्या गुरुदत्तच्या आर-पार, मिस्टर और मिसेस फिफ्टी फाईव मधील आणि आबरू, एक राज, प्यासा, शराफत, दिल और मोहब्बत मधील भूमिका विशेष गाजल्या. १९५० ते १९६०च्या दशकातील ५० सिनेमात त्यांनी काम केलं. उमादेवी उर्फ टूनटून यांचे २४ नोव्हेंबर २००३ रोजी निधन झाले.

# अहिल्यानगरात मराठा समाजाचा विवाहाच्या आचारसंहितेचा निर्धार

■ अहिल्यानगर

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर मराठा समाजाच्या वतीने दोन महिन्यांपूर्वी लग्नासाठीची आचारसंहिता घालून दिली होती. त्यानंतर मराठा समाजाने आज अहिल्यानगरमध्ये लग्नाच्या आचारसंहितेचा प्रचार-प्रसार व्हावा आणि ती समाजात रुजवावी यासाठी मराठा लग्न आचारसंहिता संमेलन भरवण्यात आले. या संमेलनाला हभप भास्करगिरी महाराज, हभप जंगले महाराज शास्त्री, पद्मश्री पोपटराव पवार , आमदार संग्राम जगताप, माजी कुलगुरू सर्जेराव निमसे उपस्थित होते. संमेलनात विवाहाच्या आचारसंहितेचा निर्धार करण्यात आला असून हुंडा, प्री-वेडिंग, डीजे, खर्च नको यासंबंधीचे मुद्दे मांडण्यात आले. या आचारसंहितेनुसार, लग्नात हुंडा देणे-घेणे पूर्णतः टाळावे ,हुंड्याऐवजी मुलीच्या नावाने मुदत ठेव करावी, प्री-वेडिंगचा व्हिडिओ जर लग्नात दाखवला तर उठून जावे, डीजे ऐवजी पारंपारिक वाद्य वापरावी , लग्न सोहळा १०० ते २०० लोकांमध्ये करावा, कर्ज काढून लग्नात खर्च करू नये, हार घालताना नवरा नवरीला उचलू नका, लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत, असे आवाहन करण्यात आले.

# नितीन गडकरींच्या घराला बॉम्बने उडवण्याची धमकी



■ नागपूर

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूरमधील घराला थेट बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली. हा धमकीचा फोन आज सकाळी ९ वाजता पोलीस नियंत्रण कक्षाला आला. त्यानंतर पोलिसांनी गडकरी यांचे महाल आणि वर्धा रोडवरील दोन्ही घरे तपासली.या तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही.

या प्रकरणात प्रतापनगर पोलिसांनी उमेश राऊत नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. उमेश हा कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका मित्रासोबत भाड्याच्या घरात राहतो. ते दोघेही मेडिकल चौकातील एका दारूच्या भट्टीवर काम करतात. फोन मित्र वापरत होता आणि नेमका कोणाला फोन केला हे माहिती नाही असा दावा उमेशने चौकशीत केला .

पोलीस उपायुक्त सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी म्हणाले की. धमकीचा फोन ११२ आपत्कालीन क्रमांकावर आल्यामुळे गडकरी यांच्या सुरक्षा पथकाला तातडीने सूचना देण्यात आली. श्वानपथक आणि बॉम्बशोध पथक घटनास्थळी दाखल झाले. सुदैवाने कोणताही स्फोटक पदार्थ आढळला नाही.



## आजचे राशी भविष्य

सोमवार दि.४ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | दिवसभर कामाची दगदग जाणवेल. प्रवास करताना आरोग्याची काळजी घ्या. मालमत्तेसंबंधीच्या कामांमध्ये अडचणी उद्भवू शकतात. |
| वृषभ | व्यवसायामध्ये नवीन संधी उपलब्ध होतील.आर्थिक गुंतवणूक करण्याचे मनात येईल. प्रिय व्यक्तींच्या भेटण्याने आनंद मिळेल. |
| मिथुन | नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. कुटुंबीयांचे सहकार्य राहील. |
| कर्क | कार्यक्षेत्रात नवनवीन कल्पना राबवण्याचे मनात येईल. आर्थिक लाभ चांगले होतील. मात्र खर्चाचे प्रमाण देखील वाढेल. |
| सिंह | सरकारी कामांमध्ये अडचणी उद्भवू शकतात. अधिक वेळ द्यावा लागेल. घरामध्ये पाहुणेमंडळींचे आगमन होईल. |
| कन्या | दिवसभर उत्साहाने कार्यरत राहाल. व्यवसायातून आर्थिक प्राप्ती चांगली होईल. प्रिय व्यक्तींकडून भेटवस्तू मिळतील. |
| तूळ | कामानिमित्त प्रवासाचे योग येतील. नोकरीमध्ये एखादी जबाबदारी स्वीकारावी लागेल. कुटुंबीयांसाठी खर्च कराल. |
| वृश्चिक | मनातील चिंता दूर होतील. जोडीदाराचे आर्थिक सहाय्य लाभेल. नोकरीत सहकारी वर्गाशी पटवून घ्यावे लागेल. |
| धनु | महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळा येऊ शकतो. जोडीदाराच्या मर्जीप्रमाणे वागावे लागेल. संततीची विनाकारण चिंता कराल. |
| मकर | नोकरीमध्ये तुमचे कौशल्य सिद्ध कराल. काहींना दूरदेशी जाण्याचे योग येतील. जोडीदाराचे सहकार्य राहील. |
| कुंभ | व्यवसायामध्ये नवीन योजना फायदेशीर ठरतील. संततीच्या बाबतीत शुभ वार्ता समजतील. प्रेम त पूरक प्रतिसाद मिळेल. |
| मीन | व्यवसायामध्ये स्थित्यंतरे जाणवतील. घरात धार्मिक कार्याचे आयोजन कराल. संततीसौख्य चांगले राहील. |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 03/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- GL-02 : 8471

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1225 | 5904 | 6309 | 6457 | 6586 | 7860 | 8207 | 8329 | 8759 | 9904 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0201 | 2256 | 3516 | 3953 | 4420 | 5510 | 5561 | 7074 | 8975 | 9254 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0994 | 2090 | 4308 | 6170 | 6971 | 7145 | 7674 | 7799 | 8510 | 8549 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0660 | 1515 | 2720 | 3635 | 4649 | 5532 | 6366 | 7211 | 8168 | 8985 |
| 0050 | 0707 | 1539 | 2775 | 3729 | 4742 | 5550 | 6440 | 7267 | 8191 | 9036 |
| 0059 | 0723 | 1618 | 2812 | 3878 | 4753 | 5552 | 6451 | 7297 | 8222 | 9079 |
| 0072 | 0755 | 1631 | 2885 | 3889 | 4764 | 5556 | 6681 | 7329 | 8294 | 9121 |
| 0114 | 0760 | 1808 | 2914 | 3934 | 4768 | 5566 | 6686 | 7332 | 8388 | 9148 |
| 0149 | 0823 | 1823 | 3009 | 3940 | 4847 | 5575 | 6706 | 7355 | 8402 | 9191 |
| 0160 | 0872 | 1969 | 3044 | 4014 | 4871 | 5586 | 6790 | 7492 | 8418 | 9525 |
| 0162 | 0875 | 2025 | 3059 | 4170 | 4893 | 5706 | 6866 | 7503 | 8421 | 9664 |
| 0220 | 0897 | 2114 | 3143 | 4231 | 4939 | 5733 | 6920 | 7577 | 8465 | 9697 |
| 0242 | 0928 | 2152 | 3184 | 4264 | 5027 | 5754 | 6922 | 7659 | 8487 | 9733 |
| 0310 | 0990 | 2182 | 3239 | 4294 | 5055 | 5854 | 6964 | 7707 | 8496 | 9778 |
| 0324 | 1073 | 2199 | 3284 | 4333 | 5119 | 5960 | 6967 | 7739 | 8591 | 9790 |
| 0349 | 1079 | 2246 | 3322 | 4424 | 5156 | 6070 | 6999 | 7774 | 8647 | 9807 |
| 0406 | 1082 | 2261 | 3340 | 4443 | 5162 | 6104 | 7082 | 7794 | 8746 | 9844 |
| 0409 | 1132 | 2273 | 3342 | 4449 | 5195 | 6143 | 7118 | 7856 | 8808 | 9858 |
| 0506 | 1161 | 2286 | 3344 | 4458 | 5286 | 6163 | 7163 | 7977 | 8843 | 9898 |
| 0531 | 1181 | 2339 | 3363 | 4461 | 5461 | 6164 | 7164 | 8007 | 8858 | 9965 |
| 0548 | 1232 | 2362 | 3371 | 4544 | 5482 | 6226 | 7171 | 8059 | 8871 | 9991 |
| 0560 | 1341 | 2424 | 3393 | 4595 | 5487 | 6268 | 7175 | 8060 | 8895 | 9993 |
| 0576 | 1366 | 2480 | 3475 | 4612 | 5497 | 6270 | 7177 | 8080 | 8938 | 9994 |
| 0634 | 1384 | 2716 | 3578 | 4646 | 5505 | 6335 | 7197 | 8114 | 8948 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे.• प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ४/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ० | ३ | ८ |
| ०४ | ३१ | ८१ |
| ०९ | ३६ | ८६ |
| १४५ | १३९ | १८९ |
| २८० | २४७ | २६० |

# महायुतीमध्ये रिपब्लिकनला जागा सोडण्याची जबाबदारी भाजपाची

■ मुंबई

महायुतीत अनेक पक्षांचा समावेश असला तरी, रिपब्लिकन पक्ष प्रमुख हा घटक पक्ष असल्याने भाजपाने त्याला जागा सोडण्याची जबाबदारी घ्यावी, असे स्पष्ट मत रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आज रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र राज्य समितीची बैठक पार पडली. या बैठकीत आठवले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

### आठवलेंचे वक्तव्य

यावेळी ते म्हणाले की, रिपब्लिकन पक्ष २०१२ साली युतीत आला आणि त्यामुळेच युतीचे महायुतीत रूपांतर झाले. त्यामुळे आगामी मुंबई पालिकेत रिपब्लिकन पक्षाला २० ते २५ जागा, जिल्हा परिषदेत ५ जागा आणि पंचायत समितीमध्ये १ जागा सोडली पाहिजे. महायुतीमध्ये अनेक पक्ष आले असले तरी प्रमुख पक्ष म्हणून भाजपाने रिपब्लिकन पक्षाला जागा सोडण्याची जबाबदारी घेतली पाहिजे.

# काँग्रेसच्या पदाधिकार्यांची दोन दिवसीय कार्यशाळा

■ मुंबई

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची नविनयुक्त कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर आता संघटना मजबूतीसाठी पावले उचलायला काँग्रेस पक्षाने सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून पुण्याच्या खडकवासला येथे महाराष्ट्र काँग्रेसच्या निवनियुक्त पदाधिकार्यांची दोन दिवसीय निवासी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

११ व १२ ऑगस्ट रोजी पुण्याच्या खडकवासला येथील सोरिना हिल रिसॉर्ट येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून सर्व नवनियुक्त पदाधिकार्यांसह राज्यातील काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे १० ऑगस्ट रोजीच या कार्यशाळेसाठी पुण्यात पोहोचणार आहेत.

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 03/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- MG-08 : 7553

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- : 0517 | 0571 | 0962 | 1223 | 8104 (अंबिका एजन्सी - दादर, मुंबई)

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0812 | 1882 | 2663 | 3002 | 3209 | 4438 | 6880 | 6885 | 7150 | 8932 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0027 | 1408 | 1999 | 3195 | 4272 | 5066 | 5915 | 5943 | 7984 | 8241 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0003 | 0838 | 1622 | 3331 | 4294 | 4724 | 5835 | 6746 | 7722 | 8790 |
| 0004 | 0859 | 1666 | 3333 | 4341 | 4928 | 5863 | 6752 | 7739 | 8837 |
| 0027 | 0960 | 1712 | 3340 | 4342 | 4999 | 5950 | 6818 | 7878 | 8842 |
| 0066 | 1001 | 2115 | 3355 | 4430 | 5151 | 6043 | 6874 | 7964 | 8886 |
| 0260 | 1086 | 2245 | 3358 | 4444 | 5393 | 6094 | 6918 | 8000 | 8892 |
| 0274 | 1162 | 2382 | 3417 | 4446 | 5453 | 6338 | 6995 | 8015 | 9043 |
| 0303 | 1212 | 2426 | 3735 | 4465 | 5465 | 6339 | 7175 | 8079 | 9046 |
| 0335 | 1214 | 2445 | 3786 | 4522 | 5543 | 6406 | 7177 | 8083 | 9122 |
| 0439 | 1281 | 2942 | 3821 | 4541 | 5554 | 6541 | 7327 | 8092 | 9204 |
| 0534 | 1421 | 2970 | 3930 | 4542 | 5562 | 6616 | 7446 | 8110 | 9294 |
| 0578 | 1422 | 3073 | 3943 | 4544 | 5576 | 6663 | 7597 | 8355 | 9392 |
| 0666 | 1461 | 3143 | 4043 | 4545 | 5582 | 6678 | 7677 | 8409 | 9590 |
| 0699 | 1515 | 3292 | 4114 | 4554 | 5656 | 6699 | 7681 | 8595 | 9712 |
| 0786 | 1519 | 3316 | 4124 | 4663 | 5731 | 6703 | 7700 | 8687 | 9889 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे.• प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 03/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- MO-05 : 1093

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1544 | 1589 | 1880 | 2339 | 2492 | 3165 | 3996 | 5104 | 5493 | 5531 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1227 | 1307 | 1469 | 2061 | 2842 | 3000 | 3364 | 4766 | 4906 | 5703 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1015 | 2092 | 3346 | 4017 | 5179 |
| 1123 | 2118 | 3450 | 4037 | 5264 |
| 1165 | 2144 | 3483 | 4068 | 5553 |
| 1181 | 2172 | 3486 | 4074 | 5578 |
| 1202 | 2218 | 3568 | 4249 | 5583 |
| 1227 | 2288 | 3638 | 4251 | 5587 |
| 1385 | 2294 | 3667 | 4312 | 5591 |
| 1489 | 2324 | 3708 | 4717 | 5599 |
| 1644 | 2692 | 3790 | 4870 | 5647 |
| 1648 | 2696 | 3793 | 4895 | 5711 |
| 1786 | 2906 | 3842 | 4914 | 5726 |
| 1825 | 2922 | 3941 | 5059 | 5771 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे.• प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# सिंहस्थापूर्वीच श्रेयवादाचे आखाडे

देशभरात जिथे जिथे कुंभमेळा होतो तिथे तिथे चांगल्या पद्धतीची व्यवस्था ठेवण्याकरीता प्रयत्न केले जातात. कारण लाखाच्या नव्हे तर कोटींच्या संख्येत लोक या कुंभमेळ्यांना येतात. या कुंभमेळ्यांचे परंपरेने महत्त्वाचे ठरलेले साधुसंतांचे आखाडे हादेखील या कुंभमेळ्याचा अत्यंत प्रमुख भाग असतो. प्रत्येक आखाड्याची व्यवस्था ठेवण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न होतात. तरीसुद्धा या आखाड्या आखाड्यांमधले मतभेद केव्हाही उफाळून येण्याची शक्यता असते. नाशिकच्या कुंभमेळ्याच्या तयारीवरूनही असेच आखाडे तयार झालेले आहेत. ते राजकीय तर आहेतच, शिवाय सामाजिक आणि तिथल्या व्यवस्थांचे श्रेय घेण्यासाठी पुरोहितांच्याही आखाड्यांमध्ये जोरदार धमासान सुरू झाली आहे. त्र्यंबकेश्वरमध्येसुद्धा तीच परिस्थिती असून, सिंहस्थापूर्वी सुरू झालेला संघर्ष केवळ त्यात घुसलेल्या राजकारणाचा परिणाम ठरतो. गोदावरीवरच्या नित्यनैमित्तिक कर्मकांडाचे काम करणाऱ्या पुरोहित संघामध्ये दोन तट पडलेले आहेत. याशिवाय सरकारने ज्या गोदा आरतीसाठी घसघशीत दहा कोटींची तरतूद केली त्या आरतीच्या निधी आणि श्रेयासाठी दोन गट पडलेले पाहायला मिळतात म्हणूनच आज तिथे दोन गोदावरी आरत्या होतात. पुरोहित संघ दोन, गोदावरीच्या आरत्या दोन आणि आता नाशिकसाठी पालकमंत्र्यांचे दोन दावे केले जात आहेत. सिंहस्थापूर्वीच नाशिकमधली ही आखाडेबाजी केवळ यासाठी खर्च होणाऱ्या पैशावर डोळा ठेवून सुरू झालेली दिसते. कुंभमेळ्याचा व्यापक हेतू किंवा उद्दिष्ट याच्याशी कोणाला काही घेणे देणे उरलेले नाही. येणाऱ्या वर्षभरात जेवढी काही कामे होतील त्याचा खर्च जवळपास पंचवीस हजार कोटींपर्यंत जाऊन पोहोचेल. या सगळ्या अर्थकारणासाठी नाशिकमधले राजकारणही सक्रिय झालेले आहे. आपापल्या मर्जीतल्या कंत्राटदारांची वर्णी लावून घेण्यापासून ते आपापले वर्चस्व प्रस्थापित करून आपले राजकीय महत्त्वही सिद्ध करण्याचा खटाटोप पाहायला मिळतो. कुंभमेळा आदर्श स्वरूपाचा होईल की नाही हे काहीच सांगता येत नाही. परंतु सध्याच्या गोदावरीवरच्या गटातटातला शहकाटशह पाहिल्यानंतर कुंभमेळा आदर्श होण्याची फारशी शक्यताही उरत नाही.

**दोन आरत्यांमधली विषमता**

या सगळ्या व्यवस्थापनासाठी सरकारी यंत्रणा जरी कार्यरत झालेल्या असल्या तरी त्यांच्यावर आपला प्रभाव राखण्याचा प्रयत्न होतो आहे. सध्या तरी राजकीय आघाडीवर गिरीश महाजन हे सूत्रसंचालन करताना दिसतात. परंतु त्यांच्या एक तंत्री कारभारावरून देखील आपापसात मोठी धुसपूस सुरू आहे. ते भलेही राजकीय उठाठेवींसाठी तथाकथित संकट मोचक असले तरीही सिंहस्थासाठी संकटकारक आहेत अशीच त्यांच्यावर दबक्या आवाजात टीका होत राहते. गोदावरी आरती असेल किंवा तिथल्या पुरोहित संघाचे दुखणे असेल यामधल्या लोकांची राजकीय आणि सामाजिक वाटणी झालेली दिसते. दोन पुरोहित संघांचे दोन वेगवेगळे राजकीय गॉडफादर असावेत, असेच सगळे तिथले वातावरण दिसते. तर गोदावरी आरतीला राजकीय व्यासपीठ बनवण्याचाही अट्टाहास दिसून येतो. केवळ गोदावरीची सर्वांगसुंदर आरती आणि आरतीचा तो अर्धा-पाऊण तासांचा देखणा कार्यक्रम एवढेच त्यांचे मर्यादित उद्दिष्ट आहे. परंतु आता पुरस्कारांच्या खिरापतीपासून ते वेगवेगळ्या राजकीय उपक्रमांचेही ते व्यासपीठ होऊ लागले आहे. अलिकडेच तिथे समरसता नावाचा प्रकार झाला. पण जिथे दोन आरत्या होतात. म्हणजे आरती करणाऱ्यांमध्येसुद्धा समरसता होऊ शकलेली नाही हाही एक मोठा विरोधाभासच ठरतो. याच प्रकारचे विचारसरणीचे मतभेद पुरोहित संघातही पाहायला मिळतात. तिथे राजकीय घुसखोरी होऊ नये म्हणून प्रयत्न जरी होत असले तरी ते यशस्वी झालेले नाहीत. जो सिंहस्थ कुंभमेळा देशाच्या एकतेचे प्रतीक म्हणून आणि परंपरेचा गौरव म्हणून सांगितला जातो. त्या नाशिकच्या सिंहस्थासाठी मतभेदांचे टीकेचे आणि आरोपांचे महापर्वच सुरू झाल्याचे पाहायला मिळते. आपापल्या माणसांची वर्णी लावून घेण्याचा अट्टाहास सुरू आहे. आणि वेगवेगळ्या संस्था या आपल्याच मुठीमध्ये राहतील यासाठी बरीच धडपडही पाहायला मिळते. आतापासूनच या मतभेदांची तीव्रता ज्या प्रखरतेने पुढे येते आहे. ती पाहिल्यावर पुढच्या वर्षभरात मतभेद पराकोटीला जाण्याची शक्यता आहे. अर्थात या सगळ्याला साधुसंतांच्या आखाड्यांपेक्षाही राजकीय आखाड्यांची मोठी झालर असल्याने हे मतभेद दाबून टाकण्याचे तितकेच शर्थीचे प्रयत्न होत राहतात.

**नमामी गोदेचे अपयश**

प्रश्न एवढाच आहे की, ज्या पद्धतीचा समजूतदारपणा किंवा समन्वय का निर्माण होऊ शकत नाही. याचा अर्थ या सगळ्या सिंहस्थाच्या व्यवस्थापनासाठी एक परिपक्व समन्वय समितीची आवश्यकता होती. ती निर्माण झालेली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून नमामी गोदेचाही प्रयोग याठिकाणी सुरू झाला. प्रामुख्याने नमामी गंगेप्रमाणे गोदावरीचे प्रदूषण दूर करण्याचा त्यामागे प्रमुख हेतू होता. परंतु तोदेखील अपयशी ठरल्याची कबुली या खात्याच्या मंत्री पंकजा मुंडेंनीच दिलेली आहे. म्हणजे गोदावरीचे प्रदूषण दूर करायला प्राधान्यच दिले गेलेले नाही. आता कुंभमेळ्याच्यानिमित्ताने जी काही तात्पुरती सफाई होईल त्याच्यावरच गोदेच्या स्वच्छतेची भलामण केली जाईल. म्हणजे राजकीय स्तरावर गोदावरीच्या स्वच्छतेच्या घोषणेलाच कचऱ्याची टोपली दाखवली गेली असे म्हणावे लागते. स्वाभाविकपणे गोदावरीतच प्रदूषण असल्याने तिथे भरणाऱ्या सिंहस्थ उपक्रमातही मतभेदांचे प्रदूषण उफाळून आलेले दिसते. गेल्या काही दिवसात तर या सगळ्या संघर्षाचे स्वरूप ज्या पद्धतीने वाढलेले आहे ते पाहता साधुसंतांच्या त्या आखाड्यापेक्षा सिंहस्थाच्या श्रेय घेणाऱ्यांचे आखाडे अधिक चिंताजनक ठरतात. हे प्रकार वाढू नयेत म्हणून त्यावर राजकीय फवारणीचाच उपाय करावा लागेल. पुरोहित संघ असो किंवा गोदावरी आरती असो किंवा नाशिकचे पालकमंत्रिपद असो या सगळ्यांनाच त्यांच्या कामाच्या मर्यादा घालून द्याव्या लागतील. आज त्या नसल्यानेच मनमानीपणालाही ऊत आल्यासारखे चित्र आहे.


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**दररोज कोणाच्या तरी आनंदाचे कारण बना. तुम्हाला यातून मिळणारा आनंद तुम्ही दिलेल्या आनंदापेक्षा जास्त असतो.**

**पंचांग**

**सोमवार, ४ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**श्रावण शुक्ल दशमी**
**नक्षत्र : अनुराधा**

**रवी उदय- ०६-१८**
**रवी अस्त- १९-१२**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० वृश्चिक**

**कलश दशमी; श्रावणी सोमवार, शिवामूठ-तीळ**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### फराळी पॅटिस



★ **साहित्य :-** १ १/४ कप- कोणतेही फराळी पीठ, चार- उकडलेले बटाटे, १/३ कप- भाजलेले शेंगदाणे, एक चमचा- जिरे, चवीनुसार मीठ, तीन- हिरव्या मिरच्या, आले किस, कोथिंबीर, एक चमचा- लिंबाचा रस

★ **कृती :-** सर्वात आधी एका मोठ्या भांड्यात फराळी पीठ काढा. त्यात चवीनुसार जिरे आणि मीठ घाला. दुसरीकडे उकडलेल्या आणि मॅश केलेल्या बटाट्यांमध्ये बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या तुकडे, कोथिंबीर आणि किसलेले आले घाला आणि सर्वकाही चांगले मिसळा. आता भाजलेले शेंगदाणे बारीक वाटून घ्या आणि मिश्रणात घाला. शेंगदाण्याचे तुकडे खूप चवदार लागतात. तसेच लिंबाचा रस देखील घाला. आता मिश्रणातून गोल पॅटिस बनवा. तसेच फराळी पीठात थोडे पाणी घालून जाड बॅटर तयार करा. आता एका पॅनमध्ये तूप किंवा शेंगदाणा तेल गरम करा. पॅटिस बॅटरमध्ये बुडवा आणि नंतर त्या पॅनमध्ये ठेवा. पॅटिस मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळा आणि नंतर जास्त तेल काढण्यासाठी किचन नॅपकिनवर ठेवा. तर चला तयार आहे आपले फराळी पॅटिस रेसिपी. उपवासाच्या चटणीसोबत नक्कीच सर्व्ह करा.



# शेवटच्या चेंडूवर होल्डरचा विजयी चौकार

## वेस्ट इंडिजने ८ वर्षांनी पाकिस्तानला नमवले

**८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर वेस्ट इंडिजने पाकिस्तानविरुद्धच्या विजयाचा दुष्काळ संपवण्यात यश मिळवले. फ्लोरिडामध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात १३३ धावसंख्येचा पाठलाग करताना शेवटच्या चेंडूवर होल्डरने चौकार ठोकल्यामुळे वेस्ट इंडिजने पाकिस्तानवर २ विकेटने विजय मिळवला. या विजयासह वेस्ट इंडिजने मालिकेत १-१ ची बरोबरी साधली. याआधी वेस्ट इंडिजने २०१७ मध्ये पाकिस्तानविरुद्ध शेवटचा विजय मिळवला होता.**




■ लॉडरहिर्ल

**नाणेफेक** जिंकून प्रथम फलंदाजी केल्यानंतर पाकिस्तान संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पॉवरप्लेमध्येच पाकिस्तानने २४ धावांवर ३ विकेट गमावल्या. कर्णधार सलमान आघाच्या ३८ आणि हसन नवाजच्या ४० धावांमुळेच संघ २० षटकांत १३३ धावांपर्यंत पोहोचू शकला. या दोघांव्यतिरिक्त एकाही पाकिस्तानी फलंदाजाला २० धावांचा टप्पाही ओलांडता आला नाही. या काळात ६ फलंदाज एकाच अंकात बाद झाले. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिज संघाची सुरुवात खूपच लाजिरवाणी झाली. अर्धे संघ ७० धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले होते. धावसंख्या १०० पर्यंत पोहोचली, तोपर्यंत ७ फलंदाज बाद झाले होते. संघ सलग ७ व्या पराभवाच्या उंबरठ्यावर होता. जेसन होल्डर आणि शेफर्ड यांनी ८ व्या विकेटसाठी १६ चेंडूंत २९ धावांची भागीदारी केली. शेवटच्या षटकात वेस्ट इंडिजला जिंकण्यासाठी ८ धावांची आवश्यकता होती. होल्डरने पहिल्या चेंडूवर १ धाव घेतली आणि शेफर्डला स्ट्राईक दिला. दुसऱ्या चेंडूवर शेफर्ड पायचीत झाला. संघ पुन्हा अडचणीत आला. तिसऱ्या चेंडूवर शमार जोसेफने एक धाव घेतली. चौथ्या आणि पाचव्या चेंडूवर प्रत्येकी १ धाव झाली. आता संघाला १ चेंडूवर ३ धावांची आवश्यकता होती. जेसन होल्डरने चौकार ठोकत आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

## आशिया कप! दुबई स्टेडियमवर भारत-पाकचा सामना १४ सप्टेंबरला

■ दुबई

**पुरुषांच्या** आशिया क्रिकेट कप सामन्यांच्या ठिकाणांची घोषणा आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी केली. आशिया कप ९ ते २८ सप्टेंबरदरम्यान संयुक्त अरब अमिरातीमध्ये (यूएई) खेळला जाईल. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ सप्टेंबर रोजी दुबई स्टेडियमवर खेळला जाईल. भारत आणि पाकिस्तानचे संघ स्पर्धेत एकाच गटात आहेत.

भारत, पाकिस्तान, ओमान आणि युएई यांना एकाच गटात स्थान देण्यात आले आहे. श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे गट 'ब' मध्ये आहेत. गटातील सर्व संघ एकमेकांविरुद्ध १-१ सामने खेळतील. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी युएई, १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तान आणि १९ सप्टेंबर रोजी ओमानशी होईल. जर भारत आणि पाकिस्तान सुपर-४ टप्प्यांत पोहोचले तर दोन्ही संघ २१ सप्टेंबर रोजी पुन्हा एकदा एकमेकांसमोर येतील.

## भारताच्या नागलचे आव्हान उपउपांत्यपूर्व फेरीत समाप्त

■ हॅगेन (जर्मनी)



**हॅगेन** येथे सुरू असलेल्या हॅगेन एटीपी चॅलेंजर्स टेनिस स्पर्धेत भारताच्या सुमित नागलचे आव्हान उपउपांत्यपूर्व फेरीत समाप्त झाले. दुसऱ्या फेरीतील सामन्यात बिगर मानांकीत तसेच कनिष्ठ गटातील फ्रेंच ग्रँन्डस्लॅम विजेता निलेश मॅकडोनाल्डने नागलला पराभूत केले. दुसऱ्या फेरीतील सामन्यात मॅकडोनाल्डने नागलचा ६-२, ४-६, ६-४ अशा सेट्समध्ये पराभव करत तिसरी फेरी गाठली. पावसाच्या अडथळ्यामुळे हा सामना अनेकवेळा अर्धवट स्थितीत थांबावा लागला. उभय खेळाडूंमधील ही लढत सव्वादोन तास चालली होती. अमेरिकेतील लेक्झींग्टन खुल्या टेनिस स्पर्धेत भारताच्या दक्षिणेश्वर सुरेशचे आव्हान जर्मनीच्या इलॉट स्पिझेरीकडून ७-६(७-४),६-४ असे संपुष्टात आणले. कझाकस्तानमध्ये सुरू असलेल्या प्रेसीडेन्ट चषक टेनिस स्पर्धेत भारताच्या करणसिंगचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत इटलीच्या बिंदाकडून ४-६, ४-६ असे संपुष्टात आले.

## रत्नागिरीत कबड्डीसाठी क्रीडा संकुल उद्योग मंत्री उदय सामंतांची घोषणा

■ रत्नागिरी

**रत्नागिरीत** फक्त कबड्डीसाठी क्रीडा संकुल उभारणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री व रत्नागिरी जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष उदय सामंत यांनी राज्यस्तरीय कबड्डी उजळणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी काढले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने रत्नागिरी जिल्हा व रत्नागिरी तालुका हौशी कबड्डी असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी, नाचणी रोड येथील दैवज्ञ भवन येथे दोन दिवस आयोजित करण्यात आलेल्या पंच उजळणी शिबिरास ते मार्गदर्शन करत होते.

महाराष्ट्रातील पंचांनी आपले नाव देश व राष्ट्रीय पातळीवर उंचावले पाहिजे. पंचांची भूमिका ही रामशास्त्री प्रभुणे यांच्या सारखी निःपक्षपाती असावी, असेही ते पुढे म्हणाले. याप्रसंगी राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे हे देखील उपस्थित होते. सर्वच प्रकारच्या स्पर्धेतून उत्तम कामगिरी करणाऱ्या निवडक पंचांचा सन्मान राज्य संघटनेने करावा जेणेकरून त्यांच्यात स्पर्धात्मक चढाओढ होईल, असे चांदेरे यांनी सुचविले. या शिबिरास 'अ' आणि 'ब' श्रेणीतील १३० पेक्षा अधिक पंचांनी सहभाग घेतला होता. नियमांच्या उजळणीबरोबर पंचांची शारीरिक क्षमता वाढविण्याकरिता भाटे या सागरी किनारी पुरुषोत्तम प्रभू यांनी पंचांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्याचा सर्व पंचांनी आनंद घेतला. प्रोजेक्टवर सामन्यांची चित्रफीत दाखवून निर्णयाबाबत विश्लेषण करण्यात आले.

## विश्व कुस्ती स्पर्धेत भारतीय महिला चमकल्या

■ अॅथेंस

**ग्रीसमधील** अॅथेंसमध्ये झालेल्या १७ वर्षांखालील वयोगटाच्या विश्व महिलांच्या कुस्ती चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय कनिष्ठ महिला मल्लांनी चमकदार कामगिरी करून ६ पदकांची कमाई केली. भारतीय कनिष्ठ महिला मल्लांनी २ सुवर्ण, ३ रौप्य आणि १ कांस्यपदक या स्पर्धेत मिळविले. यासह संघाने १५१ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. या स्पर्धेत अमेरिकेने १४२ गुणांसह उपविजेतेपदासह दुसरे स्थान तर जपानने ११३ गुणांसह तिसरे स्थान मिळविले. भारताच्या रचनाने ४३ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकाविले. रचनाने अंतिम लढतीत चीनच्या हुहांगचा ३-० असा पराभव करत सुवर्णपदक पटकाविले.




**ब्राझीलच्या महिला फुटबॉल संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये कोलंबियाचा ५-४ असा पराभव करून नववे कोपा अमेरिका फेमिनिना विजेतेपद पटकावले. या स्पर्धेची ट्रॉफी उचलताना ब्राझीलच्या खेळाडूंनी एकच जल्लोष केला.**

## वर्ल्ड चॅम्पियनशिप लीजेंड्समध्ये यापुढे पाकिस्तान खेळणार नाही

■ कराची

**पाकिस्तान** क्रिकेट बोर्डाने यापुढे पाकिस्तानी संघ वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्समध्ये (डब्ल्यूसीएल)सहभागी होणार नसल्याची घोषणा केली. भारत आणि पाकिस्तानमधील वादानंतर हा निर्णय घेण्यात आला. भारतीय संघाने डब्ल्यूसीएलमध्ये पाकिस्तानविरुद्ध दोन सामने खेळण्यास नकार दिला.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने रविवारी झालेल्या ७९ व्या बैठकीनंतर ही घोषणा केली. मोहसिन नक्वी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने निवेदनात म्हटले आहे की, या दुर्दैवी घडामोडी लक्षात घेता, ज्यामुळे बाह्य दबावांचा स्पष्ट आणि असह्य प्रभाव आणि निष्पक्ष खेळाच्या तत्त्वांकडे दुर्लक्ष दिसून येते. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कठोर भूमिका घेण्यास भाग पाडले जात आहे.

## यंग इंडिया मिनीथॉन स्पर्धेत नीलेश, खुशी अव्वल स्थानी

■ ठाणे



**अॅथलिट्स** तर्फे आयोजित केलेल्या पहिल्या यंग इंडिया मिनीथॉन स्पर्धेत ७.१ किलोमीटर अंतराच्या मुख्य शर्यतीत पुरुषांमध्ये नीलेश अर्सेकर आणि महिलांमध्ये खुशी सिंगने बाजी मारली. तर १९ वर्षे वयोगटाच्या ५ किलोमीटर अंतराच्या शर्यतीत संतोष शिंदे आणि गायत्री शिंदे अनुक्रमे मुले आणि मुलींच्या गटात विजेते ठरले.

ठाण्यातील वृंदावन बस स्थानकाजवळून सुरू झालेल्या या मिनीथॉन शर्यतीत १२०० हून अधिक धावपटू सहभागी झाले होते. त्यात पुढच्या रविवारी होणाऱ्या ठाणे मॅरेथॉनच्या पार्श्वभूमीवर बहुतेक धावपटूंनी या स्पर्धेकडे सर्व स्पर्धा म्हणून महत्त्व दिले होते. त्यामुळे चांगल्या रंगतदार शर्यती अनुभवायला मिळाल्या. पुरुषामध्ये विजेत्या ठरलेल्या नीलेशने अवघ्या ३३ मिलीसेकंदाच्या फरकाने सूरज झोरेला मागे टाकत पहिले स्थान मिळवले. नीलेशने ही शर्यत २१.५३ मिनिटात पूर्ण केली तर दुसऱ्या स्थानी राहिलेल्या सुरजने २२.२६ मिनिटे अशी वेळ नोंदवली. कल्पेश देवरे २२.३३ मिनिटे अशा कामगिरीसह तिसऱ्या स्थानावर राहिला. महिलांच्या शर्यतीतही खुशीने वर्चस्व राखताना साक्षी पवारला ३५ सेकंदांच्या फरकाने पाठी टाकले. खुशीने शर्यत जिंकताना ३०.३४ मिनिटे अशी वेळ नोंदवली. साक्षीने ३१.०९ सेकंदात हे अंतर धावून पार केले. मोहिनी सिंगने ३१.१९ मिनिटे अशी वेळ नोंदवत तिसरे स्थान पटकावले. प्रारंभी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व शर्यतींना झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात केली.

# बजाज ग्रुपचे माजी अध्यक्ष
# राहुल बजाज

**'बुलंद भारत की, बुलंद तस्वीर.... हमारा बजाज' ही जाहिरात आठवत नाही असा एकही भारतीय असू शकत नाही. कारण १९८० च्या दशकात घरासमोर बजाज चेतक स्कूटर म्हणजे तो श्रीमंत माणूस असे समजले जायचे. या बजाज ग्रुपचे राहुल बजाज हे भारतातील यशस्वी उद्योजकांपैकी एक उद्योजक होते. पाच दशकांमध्ये बजाज समूहाला नावारूपाला आणण्यात राहुल बजाज यांचे प्रचंड योगदान आहे. बजाज हा व्यावसायिक घराण्याचे संस्थापक राहुल बजाज यांचे आजोबा जमनालाल बजाज हे होते. त्यांच्यानंतर आलेल्या प्रत्येक पिढीने घराण्याची व्यावसायिक परंपरा पुढे नेत त्यात अधिक भर घातली.**





राहुल बजाज यांनी अर्थशास्त्र आणि विधीमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. राहुल यांचे प्राथमिक शिक्षण कॅथेड्रल अँड जॉन कॅनन स्कूलमध्ये झाले. त्यानंतर सेंट स्टीफन्स कॉलेजमधून त्यांनी दिल्ली विद्यापीठाची अर्थशास्त्र (ऑनर्स) पदवी घेतली. मुंबई विद्यापीठाची लॉ पदवी घेतल्यानंतर त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एम. बी. ए. केले.१९६५ मध्ये त्यांच्या हाती बजाज उद्योग समूहाचा कारभार सोपविला गेला. त्यांनी आपल्या कुशल नेतृत्व शैलीने प्रतिकूल परिस्थितीत बजाज घराण्याचा व्यवसाय वाढवला. राहुल बजाज १९६८ मध्ये बजाज ऑटोमध्ये कार्यकारी अधिकारी या पदी रुजू झाले. १९८० मध्ये बजाज ही स्कूटर निर्मितीमधील एकमेव कंपनी होती. त्यांच्या चेतक या स्कूटरला एवढी मागणी होती की, या स्कूटरकरिता १० वर्षांसाठीचा वेटिंग पीरियड होता. पाच सहा वर्षांनंतर स्कूटरकरिता नंबर लागल्यावर ग्राहकाला स्कूटर मिळायची, त्यावेळी त्याचा आनंद गगनात मावत नसे. राहुल बजाज यांनी अनेक कंपन्यांचे अध्यक्ष म्हणून काम केले होते. आर्थिक आणि उद्योग क्षेत्रातील त्यांचे योगदान अमूल्य असेच होते. त्यांची २००६-२०१० या कालावधीकरिता राज्यसभेकरिता खासदार म्हणून नियुक्ती झाली होती. तसेच आय. आय. टी. रुरकीसहित ७ विश्वविद्यालयांची डॉक्टरेट ही मानद पदवीदेखील त्यांना प्रदान करण्यात आली होती. १९९० च्या दशकात भारतात उदारीकरणाचे वारे सुरू झाले आणि बजाज उद्योग समूहासमोर अनेक समस्यांचा डोंगर उभा राहिला. उदारीकरणामुळे आयात स्वस्त झाली आणि प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला सुरुवात झाली.

गेल्या वर्षी राहुल बजाज यांनी बजाज ऑटोच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. पाच दशकांपासून त्यांनी बजाज ऑटोची धुरा यशस्वीरित्या सांभाळली होती. बजाज ऑटोला आघाडीवर नेण्यात राहुल बजाज यांचा महत्त्वाचा आणि मोलाचा वाटा होता. राहुल बजाज यांच्यानंतर ६७ वर्षीय नीरज बजाज यांच्याकडे बजाज ऑटोच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली होती.

बजाज ऑटोच्या यशात मोलाचा वाटा राहुल बजाज सन १९६८ मध्ये बजाज ऑटोचे सीईओ झाले. यानंतर ३० व्या वर्षी जेव्हा राहुल बजाज यांनी 'बजाज ऑटो लिमिटेड'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला, तेव्हा हे पद मिळविणारे ते सर्वात तरुण भारतीय असल्याचे सांगितले जाते. यानंतर बजाजने एका निरंकुश पद्धतीने उत्पादन केले आणि स्वत:ला देशातील सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी एक बनविण्यात यश मिळविले. वर्ष १९६५ मध्ये ३ कोटींच्या उलाढालीवरून सन २००८ मध्ये बजाजने सुमारे १० हजार कोटींची उलाढाल गाठली होती.

आर्थिक आणि व्यापार क्षेत्रातील राहुल बजाज यांच्या योगदानामुळे त्यांना अनेक पुरस्कार मिळाले होते. त्यात २००१ मध्ये भारत सरकारतर्फे पद्मभूषण, हार्वर्ड बिझनेस स्कूलकडून माजी विद्यार्थी अचिव्हमेंट पुरस्कार, नवभारत टाईम्स, अर्न्स्ट अँड यंग, सीएनबीसी टीव्ही १८ तर्फे लाईफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार, फ्रान्सच्या राष्ट्रपतींकडून 'नाईट इन द ऑर्डर ऑफ द लीजन ऑफ ऑनर' म्हणून नियुक्ती, भारत सरकारतर्फे १९७५ ते १९७७ दरम्यान ऑटोमोबाईल उद्योग विकास परिषदेचे अध्यक्षपद, १९७५ मध्ये राष्ट्रीय गुणवत्ता संस्थेतर्फे 'मॅन ऑफ द इयर', १९९२ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्सने त्यांना 'प्रिन्स ऑफ वेल्स इंटरनॅशनल बिजनेस लीडर्स फोरम'च्या सदस्यपदी आमंत्रित केले. एफ. आय.इ. फाऊंडेशनतर्फे १९९६ साली राष्ट्रभूषण पुरस्कार, लोकमान्य टिळक स्ट्रटतर्फे २००० साली मिळालेला टिळक पुरस्कार. १९८६ ते १९८९ च्या दरम्यान इंडियन एअरलाईन्सचे अध्यक्षपदही राहुल बजाज यांनी भूषविलेले आहे. तसेच २००३ ते २००६ दरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बेचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्षपदही त्यांनी सांभाळले आहे. जिनेव्हा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार परिषदेचे अध्यक्ष व सदस्य राहण्यासोबतच हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सल्लागार मंडळाचे ते सदस्य आहेत. बजाज समूहाच्या उत्कर्षामध्ये राहुल बजाज यांचा सिंहाचा वाटा आहे. आजही सामाजिक जाणिवेतून सुरू करण्यात आलेल्या जमनालाल बजाज फाऊंडेशन आणि शिक्षण संस्थेद्वारा भारतीय युवा शक्ती ट्रस्ट आणि पुणे येथील रुबी हॉल क्लिनिक चालविले जाते. राहुल बजाज यांचे १२ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. ■■■



## म्हाडा लॉटरीतील घरांचे अतिरिक्त शुल्क रद्द होणार

■ मुंबई

**म्हाडा** लॉटरीतील घरांच्या मूळ किमतींच्या व्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम आकारणी बंद ठरणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना म्हाडा सुरक्षा व मुख्य दक्षता कार्यालयातून असे सांगण्यात आले की, शासनाने २० टक्के सर्वसमावेशक किमतीत घरे मिळावीत, असे धोरण निश्चित केले आहे. या योजनेअंतर्गत घरे बांधणारे काही विकासक म्हाडाने देकारपत्रात नमूद लॉटरी विजेत्यांकडून आकारुन आर्थिक अडवणूक करत असल्याच्या तक्रारी मुख्य दक्षता विभागाकडे येऊ लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर म्हाडाने देकारपत्रामध्ये नमूद विक्री किमतीवरच करारनामा तयार करावा. सरकारी शुल्क वगळता विकासकांनी लॉटरी विजेत्यांकडून पार्किंग शुल्क व इन्फ्रास्ट्रक्चर शुल्क डेव्हलपमेंट व ॲमिनिटी, लिगल शुल्क यांच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारु नये, असे आशयाचे परिपत्रक म्हाडा सुरक्षा व मुख्य दक्षता विभागाने काढले आहे. यामुळे काही विकासकांच्या मनमानी वसुलीला चाप लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.




## रस्त्यांच्या खड्डेमुक्तीसाठी मुरबाडमध्ये पदयात्रा

■ मुरबाड

**शिरगाव-चिखले** व मुरबाड-पवाळे-बोरगाव हे रस्ते कायमस्वरूपी खड्डेमुक्त करण्यासाठी नागरिकांनी काँग्रेस तालुकाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या नेतृत्वात शिरगाव ते मुरबाड अशी ७ किमी पदयात्रा काढून प्रशासनाचे लक्ष वेधले.

पदयात्रेची सुरुवात शिरगाव येथील हनुमान मंदिर येथून करण्यात आली. तर समारोप तहसील कार्यालय, मुरबाड येथे करण्यात आला. या पदयात्रेच्या प्रमुख मागण्यांमध्ये मुरबाड-शिरगांव-चिखले व मुरबाड-पवाळे-बोरगांव रस्ता तत्काळ दुरुस्त करा, दोन्ही रस्त्याचे रुंदीकरण शेतकऱ्यांना जमिनी हस्तांतरणाचा मोबदला देऊन करावा आणि चिखले पुलाची उंची व रुंदी वाढवावी, यांचा समावेश आहे.

## उरण तालुक्यात खत टंचाईमुळे भातशेती धोक्यात! शेतकरी चिंतेत

■ उरण

**यंदा** खरीप हंगामातील भातशेतीला उरण तालुक्यात मोठा धोका निर्माण झाला आहे. संपूर्ण तालुक्यात या पिकासाठी खते मिळत नसल्याने खुरपणीला आलेले भातपीक हातचे जाण्याची भीती व्यक्त केली जात असून, शेतकरीवर्ग चिंताग्रस्त झाला आहे.

सध्या तालुक्यातील भातपिकाला जोम येण्याची वेळ असतानाच खतांचा तुटवडा जाणवत आहे. उरण तालुक्यात तसेच पनवेलमध्येही कुठेही खत मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. त्यामुळे कृषी विभागाने लवकरात लवकर खतांची उपलब्धता करून देण्याची मागणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांकडून होत आहे. मागील काही दिवस सतत पडत असलेल्या पावसामुळे या भागातील लावणीला काहीसा उशीर झाला आहे. शेतकऱ्यांनी आपली शेती ओसाड बनून वाया जावू नये म्हणून अनेक प्रयत्न करत एकएक काडी शेतात लावल्याचे सांगितले जात आहे. परंतु आता उरण तालुक्यात कुठेही खते मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. तिबार लागवड केलेल्या रोपाला खतांचा पुरवठा न झाल्यास फटका बसण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये पसरली आहे.

## कराडच्या आगाशिवनगरात बिबट्यामुळे रहिवाशांत भीती

■ कराड

**तालुक्यातील** मलकापूर हद्दीतील आगाशिवनगर येथील त्रिमूर्ती कॉलनीमध्ये बिबट्याचा वावर सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. हा बिबट्या मुक्तपणे संचार करताना सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

शुक्रवारी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास त्रिमूर्ती कॉलनी येथील निवृत्त शिक्षक भरत कुंभार यांच्या घरावरील भिंतीवरून मोकळ्या प्लॉटमध्ये बिबट्याने उडी मारली. त्यानंतर हा बिबट्या मुख्य रस्त्यावरून अभिनव कॉलनीच्या दिशेने पळत जाताना सीसीटीव्हीमध्ये चित्रीत झाला आहे. बिबट्याची बातमी कळताच त्रिमूर्ती कॉलनी व आगाशिवनगर परिसरातील नागरिक, महिला, लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या परिसरात बिबट्याचा कायमच वावर असून अलीकडे त्याचे वारंवार दर्शन लोकांना होत आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच डोंगरावर व वनविभागाच्या हद्दीत दाट झाडीमध्ये वावरणारा बिबट्या आता शहरातील नागरी वस्तीत आल्याने लोकांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे. तरी वनविभागाने याची गंभीर दखल घेऊन बिबट्याचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## मेघालयात कोळसा गायब कोर्टाच्या निर्देशानंतर चौकशी

■ शिलाँग

**मेघालयमध्ये** दोन अधिकृत साठवण केंद्रांमधून ४ हजार टन कोळसा गायब झाल्याची माहिती उघड झाल्यानंतर याप्रकरणी मेघालय उच्च न्यायालयाने तातडीने कारवाई करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. त्यानंतर सरकारने या संपूर्ण गैरव्यवहाराच्या सखोल चौकशीचे आदेश दिले.

मेघालयचे उपमुख्यमंत्री आणि गृह मंत्री प्रेस्टोन टिनसाँग यांनी सांगितले की, संबंधित जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना कोळशाच्या कथित अपहाराच्या प्रकरणाची तपशीलवार चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांची गंभीर दखल घेत चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणाचा सविस्तर अहवाल न्यायालयात सादर केला जाणार आहे. पश्चिम खासी हिल्स जिल्ह्यातील राजाजू आणि री-भोई जिल्ह्यातील दिएन्गोंगन या दोन साठवण केंद्रांमध्ये कोळसा जप्त करून ठेवला होता. हा कोळसा गायब झाल्याचा उल्लेख न्या. बी. पी. काटाके यांच्या अध्यक्षतेतील समितीच्या ३१व्या अंतरिम अहवालात झाला.

## संगमनेर पाणी पुरवठा ३० कोटी रुपयांचा प्रस्ताव

**अहिल्यानगर** - संगमनेर तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती आली असून येथील भोजापूर चारीच्या विस्तारीकरणासाठी ३० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ते आज तालुक्यातील तिगाव येथे झालेल्या जलपूजन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, भोजापूर चारीचा समावेश दमणगंगा - वैतरणा - गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ३३ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. योजनेचा प्रकल्प अहवाल अंतिम टप्प्यात असून, लवकरच अंमलबजावणी सुरू होणार आहे. भविष्यात साकूर व पंचक्रोशीतील गावांचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यात येत आहे.

## गोरेगावच्या सिध्दार्थ पालिका रुग्णालयाचे बांधकाम संथ गतीने

■ मुंबई

**गोरेगाव (पश्चिम)** सिध्दार्थ पालिका रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचे काम गेल्या दोन वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी जोगेश्वरीतील ट्रॉमा केअर सेंटर किंवा कूपर पालिका रुग्णालयात कोसो मिल दूर जावे लागत आहे. प्रशासनाने कामात गती देऊन हे रुग्णालय लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

या सिध्दार्थ रुग्णालयाची जुनी इमारत पाडण्यात आली होती. एप्रिल २०२३ मध्ये पुनर्बांधणीचे काम सुरू करण्यात आले. पुढल्या वर्षी ही अकरा मजली इमारत बांधून पूर्ण होण्याची डेडलाईन प्रशासनाची आहे. सध्या नऊ मजल्यांचे बांधकाम सुरू आहे. या कामाची धिमी गती पाहता काम डेडलाईनमध्ये पूर्ण होणे कठीण दिसते. असे सांगून स्थानिक पुढे म्हणाले, हे रुग्णालय बांधकामाच्या नावाखाली वर्षभर बंद होते. आता पुनर्बांधणीसाठी बंद आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य रुग्णांना वैद्यकीय सेवेसाठी इतर रुग्णालयात उपचाराकरिता जाताना फरफट होत आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## अमेरिकेत बेपत्ता झालेल्या ४ भारतीयांचे मृतदेह सापडले

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेतील** न्यूयॉर्कच्या बफेलो शहरातून पेनसिल्व्हेनियातील पिट्सबर्ग शहराकडे रोड ट्रीप करायला गेलेले चार भारतीय नागरिक बेपत्ता झाले होते. आज या चारही जेष्ठ नागरिकांचे मृतदेह सापडले आहेत. या चौघांचा अपघातात मृत्यू झाल्याची माहिती मार्शल काउंटी शेरीफ कार्यालयाने पत्रकाद्वारे दिली.

या निवेदनात म्हटले आहे की, आशा दिवाण, किशोर दिवाण, शैलेश दिवाण आणि गीता दिवाण हे चौघेही एकाच कुटुंबातील सदस्य होते. त्यांचे वाहन काल रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास बिग व्हीलिंग क्रीक रोडवरील एका उंच बंधाऱ्याजवळ आढळले. त्यांनी पिट्सबर्ग येथे एका मंदिराला भेट दिली होती. त्यानंतर ते वेस्ट व्हर्जिनियातील प्रभूपदाच्या पॅलेस लॉज हॉटेलकडे जाणार होते. या चौघांना २९ जुलै रोजी पेनसिल्व्हेनियाच्या एरी येथील पीच स्ट्रीटवरील बर्गर किंग स्टोअरमध्ये पाहिले होते, अशी माहिती सर्व्हेलन्स फुटेजच्या आधारे न्यूयॉर्क स्टेट गव्हर्नर कॅथी होचुल यांच्या कार्यालयातील एशियन अमेरिकन अँड पॅसेफिक आयलँडर अफेअर्सचे सिबू नायर यांनी फेसबुक पोस्टमधून दिली.



## सोलापूर रेल्वे स्थानकावर शॉर्ट सर्किटमुळे आग

■ सोलापूर

**सोलापूर** रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर आज सकाळी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. या आगीमुळे तिकीट वितरण केंद्र, एलईडी सूचना फलक आणि उद्घोषणा प्रणाली काही काळासाठी ठप्प झाली होती. त्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. आगीची माहिती मिळताच लोहमार्ग पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन दहा अग्निरोधकांच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवले. या दुर्घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नसली तरी प्लॅटफॉर्म क्रमांक एकवरील काही महत्त्वाची उपकरणे जळून खाक झाली. सुरक्षेच्या कारणास्तव जवळपास एक तास स्थानकावरील वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. आगीमुळे काही काळ प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## आंध्र प्रदेशातील दगडाच्या खाणीत ६ मजूरांचा मृत्यू

■ हैद्राबाद

**आंध्र प्रदेशातील** बापटला जिल्ह्यातील एका ग्रॅनाईटच्या खाणीत झालेल्या दुर्घटनेत ६ मजुरांचा मृत्यू झाला असून ३ जण गंभीर जखमी झाले आहेत.

बापटला जिल्ह्यातील बलिकुरुमा भागात एका ग्रॅनाईटच्या खाणीत आज सकाळी सुरुंगाचे स्फोट केले जात होते. तेव्हा अचानक दुसऱ्या बाजूच्या टोकावरील दगडाचा एक मोठा तुकडा खाली आला. त्याखाली खाणीत काम करणारे मजूर दबले गेले. त्यात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. दहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे सर्व मजूर ओडिशा जिल्ह्यातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मालेगावात मनपा कर्मचाऱ्याची भररस्त्यात तलवारीने निर्घृण हत्या

■ मालेगाव

**मालेगावमध्ये** भररस्त्यात एका मनपा कर्मचाऱ्याची तलवारीने निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना मालेगाव शहरातील नानावटी पेट्रोल पंपाजवळ घडली. नितीन अर्जुन निकम असे मृत कर्मचाऱ्याचे नाव आहे. दुचाकीवरून आलेल्या ती जणांनी नितीनवर तलवारीने वार केले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून याचा व्हिडीओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या प्रकरणाचा तपास मालेगाव पोलीस करत आहेत.

व्हायरल व्हिडिओतील दृश्य मध्यरात्री १२ वाजताच आहे. यात तोंडाला रुमाल बांधून ३ तरुण एका दुचाकीवरून आलेले दिसतात. ते झाडाच्या बाजूला दुचाकी थांबवतात आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या व्यक्तीला गाठून त्याच्यावर धारधार शस्त्र, तलवार आणि लाकडी दांडक्याने हल्ला करतात. त्यानंतर ते त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर दगड घालून त्याची हत्या करतात. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## दोन मतदानपत्रे कशी मिळाली? तेजस्वी यादव यांना आयोगाची नोटीस

■ नवी दिल्ली

**दोन** वेगवेगळे मतदार ओळखपत्रे क्रमांक असल्याने राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांना आज निवडणूक आयोगाने नोटीस बजावली. या नोटिशीत आयोगाने नमूद केले की,तेजस्वी यादव यांच्याकडे आरएबी०४५६२२८ व आरएबी २९१६१२० हे दोन मतदार क्रमांक असल्याचा संशय आहे. त्यापैकी आरएबी २९१६१२० हा क्रमांक अधिकृतपणे जारी झालेला नाही. या ओळखपत्राची माहिती आयोगाला उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे याची सखोल चौकशी करता येईल. तेली आहे. बिहार अभियांत्रिकी विद्यापीठाच्या लायब्ररी इमारतीतील मतदान केंद्र क्रमांक १२४ वर क्रमांक ४१६ वर तेजस्वी यादव यांचे नाव नोंदलेले आहे. तेथे आरएबी ०४५६२२८ हा क्रमांक आहे.

तेजस्वी यादव यांनी काल पत्रकार परिषदेत दावा केला होता की, मतदार यादीतून त्यांचे नाव गायब आहे आणि त्यांचा मतदार क्रमांक बदलला आहे. परंतु आयोगाने या दाव्याचे खंडन करत म्हटले की, यादव यांनी २०२० मधील निवडणुकीसाठी भरलेल्या नामनिर्देशन अर्जामध्ये आरएबी ०४५६२२८ हाच क्रमांक वापरला होता. त्यांच्या नावाचा समावेश मतदारयादीतही आहे.

# ‘बकैती’ सीझन १

## परीक्षण-अनिता पाध्ये सिने अभ्यासक व लेखिका

## मध्यमवर्गीयांच्या संघर्षाचा आरसा दाखवणारी कौटुंबिक सीरिज

**‘बकैती’ या शब्दाचा मराठी अर्थ होतो निरर्थक बडबड, वटवट. हेच शीर्षक असलेली एक हिंदी सीरिज झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर गेल्या आठवड्यात प्रदर्शित झाली आहे. ‘बकैती’चा अर्थ निरर्थक वटवट असला तरी सीरिज निरर्थक नाहीतर निरवळ मनोरंजन देणारी आहे.**

● **कथानक**

जुन्या गाझियाबाद येथील बकैती कटारिया मध्यवर्गीय कुटुंबाची कथा या सीरिजमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळते. संजय (राजेश तैलंग) आणि सुषमा (शीबा चड्डा) या जोडप्याला दोन मुलं आहेत - कॉलेजमध्ये जाणारी मुलगी आणि बारावीत शिकणारा मुलगा. मुलगी अभ्यासात नेहमी वरचा क्रमांक पटकवणारी आहे, तर मुलगा ४० टक्के मिळवणारा आहे. सुषमाचे वयस्कर वडील तिच्याकडे राहतात, कारण तिचा भाऊ भारताबाहेर असतो. संजय व्यवसायाने वकील असला तरी त्याची वकिली फारशी चालत नाही. त्यामुळे तो ॲफिडेव्हिट, नोटरीची काम करतो, ज्यातून फारसा पैसा हाती येत नाही. सुषमाला स्वत:चे बुटिक सुरू करायची इच्छा आहे, परंतु ती गृहिणी बनून दिवसभर घरातील कामांमध्ये व्यस्त असते. संजय त्याच्या वडिलांच्या घरामध्ये राहतो, तर त्याचे वडील त्याच्या धाकट्या भावाकडे राहतात. त्यांचे फर्निचरचे दुकान लहान भाऊ चालवत आहे. खूपच आर्थिक ओढाताण होत असल्याने संजय आणि सुषमा ठरवतात की, घरातील एक रूम भाड्याने द्यायची, ज्यामुळे दरमहा किमान दहा हजार रुपये तरी मिळतील. तशी जाहिरात तो एका वृत्तपत्रात प्रसिद्ध करतो. ती वाचून संजयचे वडील या गोष्टीला विरोध करतात. मात्र त्याच संध्याकाळी अचानक त्यांचे निधन होते. वडिलांच्या निधनानंतर धाकटा भाऊ वडिलांचे घर, म्हणजे ज्यामध्ये संजय कुटुंबासह राहत आहे, ते विकायचा आग्रह करतो आणि आधीच फारसे सख्य नसलेल्या दोन्ही भावांचे संबंध आणखी खराब होतात. संजयच्या मुलांचा देखील भाडेकरू ठेवायला विरोध असतो, कारण त्यामुळे त्यांना एकच रूम शेअर करावी लागणार असते. घरात भाडेकरू येऊ नये म्हणून संजयची मुलं काय काय शक्कल लढवतात आणि भाडेकरू घरामध्ये राहायला आल्यावर काय काय घडते, ते सीरिज पाहिल्यानंतरच कळेल.




● **कशी आहे सीरिज ?**

दिग्दर्शक अमित गुप्ता यांनी 'बकैती' ही एकदम सर्वसाधारण मध्यमवर्गीय घराची कथा असलेली सीरिज सादर केली आहे. या सीरिजमध्ये घडणाऱ्या घटना आणि वाद याच्याशी साम्य असलेले प्रसंग प्रेक्षकांच्या घरामध्ये देखील घडत असणार हे निश्चित. कारण भारतातील असंख्य घरांमध्ये घडणाऱ्या घटना या सीरिजमध्ये आहेत. त्याचसोबत मनोरंजन करणारे मजेशीर दृश्ये देखील आहेत. उदाहरणार्थ, पाण्याची टाकी कोण बंद करणार? यावर भावाबहिणीमध्ये नेहमी होणारा वाद किंवा एकच रूम शेअर करताना होणारे प्रसंग वगैरे. आजोबांचा ट्रॅक देखील फार मनोरंजक बनवण्यात आला आहे आणि तो उथळ होणार नाही याचे भान देखील ठेवण्यात आले आहे. सीरिज चांगली बनली आहे. परंतु कथानकात एक संघर्ष आणि वाद असायला हवा होता. तो नसल्यामुळे सीरिजची कथा फार साधारण बनली आहे. ही सीरिज भारतातील सामान्य मध्यमवर्गीयांच्या आयुष्याचे प्रतिनिधित्व करणारी असली तरी ती प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करत नाही. हा एकमेव मायनस पॉइंट आहे या सीरिजचा. या सीरिजची सर्वात कौतुकास्पद गोष्ट म्हणजे तत्सत पांडे, गौरव मदान आणि प्रांजली दुबे या लेखक तिकडीने मध्यमवर्गीय समस्यांमध्ये उगाचच मेलोड्रामा निर्माण न करता त्या सहजपणे सादर केल्या आहेत. सात एपिसोड असलेल्या या सीरिजचा प्रत्येक एपिसोड साधारण तीस मिनिटांचा आहे. सीरिजचा क्लायमॅक्स फार लवकर आटपण्यात आला आहे. मात्र ही सीरिज प्रेक्षकांना आनंद देते, हे निश्चित. सीरिजच्या शेवटच्या प्रसंगामध्ये सीरिजच्या दुसऱ्या सीझनचा वादा देखील करण्यात आला आहे.

> **बकैती:** वेबसीरिज
> **दिग्दर्शक:** अमित गुप्ता
> **लेखक:** तत्सत पांडे, गौरव मदान आणि प्रांजली दुबे
> **कलाकार:** राजेश तैलंग, शीबा चड्डा, तान्या शर्मा, आदित्य शुक्ला, रमेश राय
> **ओटीटी प्लॅटफॉर्म:** झी ५
> **रेटिंग:** ३/५

● **अभिनय**

या सीरिजमधील सर्व कलाकारांनी खूप सहजसुंदर काम केले आहे. डोक्यावर आर्थिक समस्यांचा बोजा वाहणाऱ्या घरातील कर्त्या पुरुषाच्या व्यक्तिरेखेमध्ये अभिनेता राजेश तैलंग यांनी उत्कृष्ट काम केले आहे. अशी व्यक्तिरेखा भारतातील अनेक घरांमध्ये आपल्याला पाहायला मिळते. घराच्या आर्थिक समस्यांना तोंड देत त्यातून मार्ग काढणाऱ्या गृहिणी सुषमाच्या भूमिकेमध्ये अभिनेत्री शीबा चड्डा शोभल्या आहेत. भावनात्मक दृश्यमध्ये त्यांनी बाजी मारली आहे. ‘बंदिश बँडिट्स’ नंतर राजेश आणि शीबा यांची ही आईवडिलांची जोडी सीरिजचा एक प्लस पॉइंट ठरली आहे. तान्या शर्माने घरातील तरुण हुशार मुलीची भूमिका चांगली केली आहे, तर आदित्य शुक्लाने अपचळ, आगाऊ मुलाची भूमिका मस्त केली आहे. दोघांची लहानसहान मुद्यांवरील भांडणे तरीही एकमेकांशी असलेले प्रेमाचे नाते पाहायला चांगले वाटते. केशव साधना, परविंदर जीत सिंग आणि रमेश राय या सहकलाकारांनी आपापल्या भूमिका प्रामाणिकपणे साकार केल्या आहेत.




# थलाईवाचा जलवा



दाक्षिणात्य सुपरस्टार थलाईवा रजनीकांत यांचा गँगस्टर ड्रामा असलेला चित्रपट ‘कुली’ गेल्या वर्षभरापासून बनत आहे. या चित्रपटाशी निगडीत एकही बातमी बाहेर येऊ नये, मीडियापर्यंत पोहोचू नये याची निर्माता-दिग्दर्शक काळजी घेत आहेत. सोशल मीडियावरून चित्रपटाच्या विषयाचा अंदाज घेतला जात आहे. परंतु आता वाट पाहणे संपुष्टात आले आहे. कारण निर्मात्यांनी आता ‘कुली’चा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. हा ट्रेलर प्रदर्शित होऊन एक तास देखील झाला नसेल, तरी त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, १.३ मिलियन व्ह्यूज मिळाले आहेत. ऋतिक रोशनच्या ‘वॉर २’ला टक्कर देणाऱ्या ‘कुली’चा ट्रेलर आहे तरी कसा? रजनीकांत यांच्या चित्रपटांचा प्रेक्षक सर्वसामान्य जनता आहे. त्यांचे चित्रपट हे मास चित्रपट म्हणजे सर्वसामान्यांसाठी बनणारे, आर्ट चित्रपटांच्या कोसो दूर असलेले चित्रपट असतात. त्यामुळे रजनीकांत यांच्या सिनेमांचे चाहते सामान्य प्रेक्षक आहेत. ‘कुली’ देखील असाच चित्रपट आहे, ज्यातील एका फ्रेममध्ये अनेक स्टार्स आहेत. ३ मिनिटे २ सेकंदांच्या ट्रेलरमध्ये भरपूर ॲक्शन पाहायला मिळते. एक मिनिट देखील बघण्याची नजर व चित्त इकडे तिकडे होऊ शकत नाही इतका जबरदस्त ट्रेलर आहे. यामध्ये आपल्याला अनेक सरप्राईज बघायला मिळतात. १४००० भारवाहकांच्या-कुलींच्यासह ज्यामध्ये एकच खलनायक आहे, जो एका भारवाहकाचा शोध घेत आहे. त्यानंतर नागार्जुन आणि आमिर खान पाठमोरे दिसतात. आपल्या जुन्या गँगसह जमलेला गँगस्टर देवाच्या या लहान ट्रेलरमध्ये इतकी ॲक्शन बघायला मिळते की, संपूर्ण चित्रपटात काय काय बघायला मिळेल याचा अंदाज लावता येईल. नागार्जुन आणि आमिरचा ॲक्शन अवतार प्रेक्षकांना सरप्राईज देणारा आहे. हा सिनेमा १४ ऑगस्ट रोजी, स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत प्रदर्शित होत आहे. ‘वॉर २’ एक स्पाय थ्रिलर चित्रपट आहे, तर कुली गँगस्टर ड्रामा आहे. कुली’मध्ये रजनीकांतसह आमिर खान, नागार्जुन, सत्यराज, उपेंद्र, श्रुती हासन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. आणि हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषेत आहे. मात्र प्रदर्शित केलेला ट्रेलर तमिळ आणि तेलुगू भाषेमध्ये आहे.

हेल्दी Me

# वजन घटवण्यासाठीचा नवा फॉर्म्युला

*सध्याची धावपळीची जीवनशैली, फास्ट फूडची सवय, तासन्‌तास स्क्रीनसमोर बसणे आणि शारीरिक हालचालीचा अभाव या सर्व गोष्टींमुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत लठ्ठपणा ही गंभीर समस्या बनत आहे. यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, मानसिक तणाव यांसारखे आजार लवकर उद्‌भवू लागतात. सुप्रसिद्ध डाएटीशियन ऋचा गंगवानी यांनी स्वतः काही नियमांचा अवलंब करून केवळ २१ दिवसांत ७ किलो वजन कमी केले आहे. त्यांच्या मते, हे नियम कुणीही सहज पाळू शकतो आणि सुरुवातीच्या काही आठवड्यांतच ५-६ किलो वजन कमी होऊ शकते. वजन कमी करण्यासाठी त्या तज्ज्ञाने १८-१०-८-४-१ असे या फॉर्म्युल्याचे नाव आहे. ही पद्धत अवलंबून त्यांनी २१ दिवसांत ७ किलो वजन कमी केले.*

**१८:६: अन्न सेवनाची वेळ मर्यादित करा**

या पद्धतीमध्ये त्यांनी रोज सकाळी ११ वाजल्यापासून संध्याकाळी ५ ते ६ वाजेपर्यंत अन्न सेवन केले. यानंतर १८ तास उपवास केला. यामुळे शरीर साठलेली चरबी ऊर्जा म्हणून वापरते. या कालावधीत फक्त पाणी, ग्रीन टी किंवा अँटी-इंफ्लेमेटरी चहा सेवन करू शकता, असे त्या सांगतात.

**दररोज १०,००० पावले चालणे**

दुसरी क्रिया म्हणजे रोज १०,००० पावले चालणे. या संकल्पाचे नियमितपणे पालन केले. या व्यायामामुळे शरीरातील मेटाबॉलिझम वाढतो आणि फॅट बर्निंग जलद होते. तसेच मनही प्रसन्न राहते.

**८ तासांची गाढ झोप :** ऋचा सांगतात की, नीट झोप घेतल्याने शरीर नैसर्गिकरित्या चरबी जाळते. याउलट झोप पुरेशी न झाल्यास हार्मोनल असंतुलन निर्माण होऊन वजन वाढण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नियमितपणे ८ तासांची शांत झोप घेणे अनिवार्य आहे.

**४ लीटर पाणी आणि अँटी-इंफ्लेमेटरी चहा**

दररोज किमान ४ लीटर पाणी पिण्याचा नियम या वेटलॉससाठी ऋचा यांनी पाळला. यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात. यासोबतच हळद, आले, दालचिनी यासारख्या घटकांपासून तयार अँटी-इंफ्लेमेटरी चहाचे सेवन केले. हा चहा त्वचा स्वच्छ ठेवण्याबरोबरच शरीरातील सूज कमी करतो.

- ५:२ पद्धत : आठवड्यात ५ दिवस सामान्य आहार, आणि २ दिवस फास्टिंग
- १४:१० पद्धत : १४ तास उपवास, १० तास अन्नसेवन. दीर्घकालीन आणि सहजशक्य होणारा पर्याय.
- १८:६ पद्धत : १८ तास उपवास, ६ तास अन्न. ही पद्धत फास्टिंगची सुरुवात करणाऱ्यांसाठी योग्य
- इंटरमिटेंट फास्टिंग सुरू करण्यापूर्वी प्रत्येकाने आपले आरोग्य, वय, जीवनशैली, आजार यांनुसार डायटिशियन किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शनासह ही पद्धत तुमच्या संपूर्ण आरोग्याला नवी दिशा देऊ शकते.



**प्रोटीनचे सेवन**


ऋचा सांगतात की, आपल्या शरीराच्या वजनाच्या प्रत्येक किलोमागे १ ग्रॅम प्रोटीन आहारात समाविष्ट केले पाहिजे. उदा. एखाद्याचं वजन ६० किलो असेल, तर दररोज ६० ग्रॅम प्रोटीन घ्यावे. यामुळे मसल्स सुरक्षित राहतात, शरीर टोन होते आणि फॅटलॉस सहज होतो.

● या पद्धतीने वजन कमी करताना होणारे फायदे ● त्वचा अधिक चमकदार आणि निरोगी बनते. ● शरीरातील सूज पूर्णपणे कमी होते. ● एनर्जी लेव्हल वाढते. ● हार्मोनल संतुलन साधले जाते.
● मानसिक आरोग्यात सुधारणा होते.
● गरजेनुसार निवडा पद्धत ● १६:८ पद्धत : १६ तास उपवास, ८ तास अन्नसेवन ● लवचिक वेळापत्रक हवे असल्यास उत्तम पर्याय

**हेल्दी टिप्स**



मधुमेही रुग्णांना पायाची त्वचा कोरडी होणे, तळव्यांची जळजळ होणे यांसारख्या समस्या भेडसावतात. तसेच त्यांना पायाला भेगा पडू न देणे अथवा जखम होऊ न देणे यासाठी काळजी घ्यावी लागते. पायाच्या भेगांसाठी
आयुर्वेदात कोकम तेल हा सर्वोत्कृष्ट उपाय सांगितला जातो. त्यामुळे मधुमेहींना नियमितपणाने या तेलाने पायाला मसाज करावा. आपल्याकडे कोकणामध्ये या तेलाचा वापर घरोघरी केला जातो. बाजारातील महागड्या क्रीमपेक्षा आणि प्रक्रियायुक्त तेलांपेक्षा कोकम तेल हे अत्यंत उपयुक्त ठरते. याखेरीज कोकम तेल, पुदिना तेल, प्युमिक स्टोनची पावडर आणि टी ट्री तेल यांचे मिश्रण असलेला साबणही उपयुक्त ठरतो.



काही कारणांमुळे डोळ्यांची आग होत असल्यास स्वच्छ कोथिंबीरीचा रस दोन-दोन थेंब दोन्ही डोळ्यांत घालावा.

# शिळा भात खाणे टाळा!




पचनास सोपा, पोटभर आणि चविष्ट – म्हणून भाताचा आवर्जून समावेश होतो. अनेकांना शिळा भात खायला आवडतो. कालचा उरलेला भात सकाळी फोडणी देऊन खाल्ला जातो किंवा थेट दह्याबरोबर नाश्त्याला घेतला जातो. पण आहारतज्ज्ञ रायन फर्नांडो यांच्या मते, शिळा भात हा बॅसिलस सेरियस नावाच्या जीवाणूंचा वाढीचा मुख्य स्रोत असतो. हे जीवाणू तांदळात अगदी सुरुवातीपासूनच अस्तित्वात असतात. शिजवल्यानंतरही त्यांच्यावर फारसा परिणाम होत नाही. पण भाताचे तापमान जसजसे कमी होते, तसतसे हे जीवाणू वेगाने वाढू लागतात आणि विषारी घटक तयार करतात. आश्चर्य म्हणजे हे बॅक्टेरिया भात शिजवल्यानंतर फक्त एक तासात वाढण्यास सुरुवात करतात. त्यातून जे विषारी पदार्थ तयार होतात, ते पुन्हा गरम केल्यानेही नष्ट होत नाहीत.
या बॅक्टेरियामुळे शरीरावर तातडीने परिणाम होतो. पोटात मळमळ, उलटी, जुलाब अशी अन्न विषबाधेची लक्षणे काही तासांत जाणवू लागतात. डॉक्टर याला फ्राईड राईस सिंड्रोम असे नाव देतात. विशेषतः लहान मुले, वृद्ध, गर्भवती स्त्रिया आणि ज्यांची प्रतिकारशक्ती कमी आहे, त्यांच्यासाठी ही विषबाधा अधिक गंभीर ठरू शकते. आपल्या घरात भात जास्त प्रमाणात शिजवण्याची सवय असते. जेवण झाल्यावर बऱ्याचदा तो तसाच स्वयंपाकघरात राहतो. पण या सवयीमुळेच बॅक्टेरियांना वाढण्याची संधी मिळते. म्हणूनच भात शिजवल्यानंतर तो लगेच खाणे किंवा लवकरात लवकर थंड करून फ्रीजमध्ये ठेवणे अत्यावश्यक आहे. तज्ज्ञ सांगतात की, भात शिजवल्यानंतर दोन तासांच्या आत तो फ्रीजमध्ये ठेवला गेला पाहिजे आणि २४ तासांच्या आत खाल्ला गेला पाहिजे. त्यानंतर तो खाऊ नये.

# कर्करोगावर नवी उपचारपद्धती

जगभरात कर्करोग या दुर्धर व्याधीचा विळखा आणि दहशत दोन्हीही झपाट्याने वाढत चालली आहे. त्याचवेळी आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने या व्याधीवर उपचार करणाऱ्या नवनवीन पद्धतींचाही शोध घेतला जात आहे. अलीकडेच दक्षिण कोरियाच्या शास्त्रज्ञांनी घातक कॅन्सर पेशींना नष्ट करण्याऐवजी त्यांचे स्वरूप सकारात्मक पद्धतीने बदलण्यात यश मिळवले आहे. कॅन्सरच्या गाठींना किरणोत्सार किंवा किमोथेरपीने लक्ष्य करण्याऐवजी, संशोधकांनी पेशींना सामान्य ऊतींसारखे वागण्यास भाग पाडण्यासाठी त्यांचे पुन:प्रोग्रॅमिंग केले आहे. ही चाचणी कोलोरेक्टल कॅन्सरवर केली गेली. या प्रक्रियेत गाठ नष्ट केली जात नाही, तर त्या पेशींमध्ये बदल घडवून आणले जातात.

**ही पद्धत कशी कार्य करते?**

कोरिया ॲडव्हान्स्ड इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी (केएआयएसटी) चे प्राध्यापक



क्वांग-ह्यून चो आणि त्यांची टीम या कार्याचे नेतृत्व करत आहेत. त्यांनी पेशींच्या या बदलासाठी ‘डिजिटल ट्विन’ नावाचे एक प्रभावी संगणकीय मॉडेल वापरले.

पारंपरिक कॅन्सर उपचारांचा उद्देश गाठीतील पेशींना नष्ट करणे असतो. यामुळे अनेकदा आजूबाजूच्या निरोगी ऊतींना हानी पोहोचते आणि त्याचे दुष्परिणामही होतात. केएआयएसटीच्या टीमने या पद्धतीला पर्याय म्हणून वेगळा मार्ग स्वीकारला. ‘ॲडव्हान्स्ड सायन्स’ या जर्नलमध्ये त्यांनी आपले संशोधन प्रसिद्ध करताना, कॅन्सर पेशींना अनियंत्रित वाढीपासून दूर ठेवून एका वेगळ्या, स्थिर ओळखीच्या दिशेने वळवण्याची एक प्रक्रिया मांडली आहे.

त्यांच्या पद्धतीच्या गाभ्याशी बेनिन (बुलियन नेटवर्क इनफरन्स ॲण्ड कंट्रोल) नावाची एक संगणकीय प्रणाली आहे.

ही प्रणाली पेशींच्या आत जीन परस्पर क्रिया कशी करतात याचा अभ्यास करून एक मॉडेल तयार करते. त्यानंतर पेशी घातक वागतील की सामान्य यावर नियंत्रण असणाऱ्या प्रमुख जनुकीय नियंत्रकांची ओळख करून घेते आणि बेनिनला पाठवते.

**उपचारपद्धती**

या संशोधनामध्ये एमवायबी, एचडीएसी२ आणि फोक्सा २ या तीन नियंत्रकांना लक्ष्य करण्यात आले. या तीन जीनचे एकत्रितपणे नॉकडाऊन (त्यांचे कार्य थांबवणे) केल्याने पेशींमध्ये विभेदीकरण सुरू होते आणि त्या सामान्य पेशीसारख्या वागू लागतात, असे दिसून आले.

**भविष्यातील शक्यता आणि आव्हाने**

कॅन्सरच्या पुढे जाऊन बेनिन ही प्रणाली इतर जैविक प्रणालींमध्येही प्रभावी ठरली आहे. तथापि, यामध्ये काही महत्त्वाच्या आव्हानांचाही समावेश आहे. त्यानुसार, या पद्धतीला विविध ऊतींना सुसंगत करणे आणि रूपांतरित पेशींची दीर्घकालीन स्थैर्य लाभणे हे आव्हानात्मक आहे. अर्थात येणाऱ्या काळात त्यात आणखी सुधारणा केल्या गेल्यास ती कॅन्सरच्या उपचारपद्धतीत क्रांतिकारक बदल घडवू शकते.

कोलोरेक्टल कॅन्सरमध्ये आतड्यातील पेशींमध्ये अनियमित वाढ आढळते. त्यानुसार या संशोधनासाठी ४२५२ पेशींच्या डेटाचा वापर करून, या टीमने ५२२ घटक असलेल्या एका जीन नेटवर्कची पुनर्रचना केली.

या सिम्युलेशनने हे सूचित केले की हे तीन जीन बंद केल्यास कॅन्सर पेशींची वाढ थांबू शकते.

ही शक्यता प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेल्या कोलोरेक्टल कॅन्सर सेल लाईन्स आणि प्राण्यांच्या मॉडेलमध्ये खरी ठरली.

एमवायबी, एचडीएसी२ आणि फोक्सा २ या ह्यूमन सेल लाईन्समध्ये, या तीन जीनचा एकत्र नॉकडाऊन केल्यावर पेशींची वाढ थांबवण्याचा परिणाम एकाच जीनच्या नॉकडाऊनपेक्षा अधिक प्रभावी ठरला.


या उपचारित पेशी उंदरांमध्ये प्रत्यारोपित करण्यात आल्या, तेव्हा त्यांच्यापासून तयार झालेल्या गाठी अनुपचारित नियंत्रण गाठींच्या तुलनेत आकाराने आणि वजनाने खूपच लहान होत्या.

पुढील विश्लेषणात असे आढळले की, उपचारित पेशी सामान्य आंत्रपेशींसारखे विशिष्ट मार्कर दर्शवत होत्या, तर कॅन्सरशी संबंधित मार्ग बंद झाले होते.

जनुक अभिव्यक्तीचा हा नमुना ‘द कॅन्सर जीनोम ॲटलस’ मध्ये नमूद केलेल्या निरोगी ऊतींच्या नमुन्याशी खूपच जुळणारा होता.

**(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)**

# नवाकाळ शब्दकोडे-१३३२



**आडवे शब्द –**

३. मालकी ५. रक्तवाहिनी, शीर ७. पावसाळयाच्या सुरुवातीला दिसणारा पक्षी, पपीहा १०. पूर्वी महिला पतीचा उल्लेख या शब्दात करीत १३. देवाच्या भरवशावर सोडलेले १५. सदा, नित्य १७. थडगे १९. असमानता २१. पाठीचे कुबड २३. उसळीचे एक धान्य २४. स्पर्धा, चढाओढ २६. धाडसी २७. स्त्री २८. पहाटेची आरती ३०. हल्या, महिषी ३१. दुसरा, अन्य ३२. इच्छा, मनीषा ३४. पत्नी, प्रेयसी ३५. किडा ३६. ढग, जलद ३७. निद्रा ३८. भगवान शंकराचे प्रिय फळ ४०. अनल, जाळ ४१. सोबती, सहचर ४३. लढवय्या ४४. खेळी, मोठी पळी ४५. वजा, कमी ४६. गोंगाट, गलका; त्यामुळे होणारा त्रास ४८. प्रेम, प्रीती ५१. पूर्वी भाडेकरूकडून घेतली जाणारी एकमुठी रक्कम ५२. कळी, अंकुर, मोड ५४. दिमाख, थाटमाट ५५. कर्ज देणारा, धनको ५६. यशस्वी, यशवंत ५७. निशिगंध ५९. श्रीकृष्णाने वसवलेली राजधानी ६०. वाईट ६२. दिवटी ६३. अपमान, उपमर्द ६६. बगळा ६७. पर्वत, गिरी ६८. वितान, चांदवा ६९. योग्य, उचित ७०. टेंभा ७२. शेवटचा ७३. राहुटी ७५. मनोहर, रम्य ७८. दर्पण ८०. भव्य, मोठे ८१. तंबूची कापडी भिंत ८२. फुफ्फुसांचा गंभीर आजार ८३. आईची किंवा वडिलांची आई ८४. वेळू, कीचक ८५. घोडी आणि गाढव यांच्या संकरातून जन्मलेला प्राणी ८७. क्षोभ, संताप ८८. दारुडा ९०. टाळयांचा गजर ९२. शासकीय ९४. दृष्टी, बघणे ९६. वरणाची केशरी डाळ ९८. दूध काढण्याचे भांडे, कासंडी १००. मच्छर १०२. राज्यसुख १०४. शरीरावरील सूक्ष्म केस १०५. विनंती, प्रार्थना १०६. राजाचा लेखनिक १०७. विश्वास, खात्री १०८. धागा, दोरा

**उभे शब्द –**

१. विशिष्ट शारीरिक सवय, अदा २. अडचण, पेच ३. आक्रमण, हल्ला ४. घाई, जलदी ५. आभाळ ६. तळे, तलाव ८. जडीबुटीची औषधे ९. बरोबर, संगतीने १०. येथे, या बाजूला ११. भेकड, घाबरट १२. आरोग्य १४. कुस्तीगीर १५. पुढारी १६. शंभर सेंटीमीटर १८. आसपास २०. आवडलेला पदार्थ पटकन खाणे २२. तंगी, आर्थिक अडचण २३. उसाचा रस काढण्याचे साधन २४. नवऱ्यामुलीची हिरवी काकणे २५. उचित वापर २७. विविध प्रकारचे २८. रागावणे, चिडणे २९. भाताची, नाचणीची पेज ३०. रेषा, रेखा ३३. आश्रम ३६. लोकप्रिय पालेभाजी ३९. अतिशय कंजूष ४१. झाडाची त्वचा ४२. नियमांचे पालन, शिस्त ४४. काळिमा ४५. त्रास, पीडा ४६. गळा दाटून येणे, गहिवर ४७. जास्तीत जास्त ४९. जंगल, अरण्य ५०. पृष्ठभागाचा तुकडा ५१. परीक्षा, तपासण्याची कुवत ५२. कुर्ता व साडीचे मुलायम उंची कापड ५३. आवड ५५. काशीनजीकचे महत्त्वाचे बौद्ध तीर्थक्षेत्र ५७. रंगेल, छंदीफंदी ५८. गुन्ह्याचा तपास ५९. खोडकर ६१. नियमित वावर ६३. शिक्षक, गुरुजी ६४. गुंडांनी धमकी देऊन उकळलेले धन ६५. टोमणा ६७. गारवा ७१. पिठीसाखर ७२. नेत्रहीन ७३. पैशांची अडचण ७४. काशी ७६. निर्विकार ७७. गुप्त धन ७९. पिंगा ८०. कोल्हा ८१. केस ८३. आमटीतला आंबट पदार्थ ८४. परोपजीवी वनस्पती ८५. पायताण ८६. मस्त ८८. नौका ८९. राघव ९१. मनाला टोचणारे ९३. विमानांचा वेध घेणारी यंत्रणा ९५. अल्प ९७. ओळ, रांग ९९. काकणांसाठी मनगटाचे माप १०१. ओझे १०३. गाय •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३१चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. कपाळ ४. उपमा ७. उलाढाल १२. स्पर्शमणी १४. रिषभ १६. यथावकाश १८. धुडगूस २०. स्मरणिका २३. पण २४. समजावणे २७. जरब २९. सकाळ ३०. सल ३१. माळ ३३. रचना ३४. जीत ३६. पाडाव ३७. नवस ३८. अन्ननलिका ४२. गाभारा ४३. काल ४४. सखा ४५. पटवेकरी ४७. समा ४९. हितगूज ५०. पहाड ५१. रीम ५२. अवसान ५४. जाजम ५६. अढी ५७. सेतू ५९. कुर्रा ६०. राणा ६१. बटाटा ६३. दैन्य ६५. पडाव ६७. देह ६९. थोर ७०. पसा ७२. तरंत ७४. कात ७५. शव ७६. पदर ७७. याचना ७९. डबघाई ८०. देवशयनी ८१. वस्ती ८२. शेळपट ८३. कल ८४. तमा ८६. लाखी ८८. जीव ९०. समानता ९४. मांजा ९५. ताकदवान ९७. जवळीक ९९. ठणका १०१. होयबा १०३. यार १०४. वानर १०५. डगर १०७. सहमती १०९. पर्ण ११०. मोजदाद १११. हाड ११२. गाणे ११३. रावा ११४. इरावती ११५. वीर ११६. वडवानल

**उभे शब्द :** १. कस्पटासमान २. कमळजा ३. पाणी ५. परिसर ६. माष ८. लापणिका ९. लय १०. श्रावण ११. देश काल वर्तमान १३. खोंड १५. भस्म १७. थापट १८. धुणे १९. गूज २१. रसना २२. काळजी २५. मळवट २६. वर्दी २८. बरका ३०. सडा ३२. भिन्न ३५. तगारी ३६. पारा ३८. अलगूज ३९. नस ४०. लिखापढी ४१. कावेरी ४३. कात ४५. पडसे ४६. कमकुवत ४७. ससाणा ४८. सांजा ४९. हिमटा ५३. वराह ५५. जबरदस्ती ५६. अन्य ५८. तूप ६२. टाप ६४. करंडक ६६. डाकाईत ६७. देहावसान ६८. अवनी ६९. थोपवणे ७१. सायाळ ७३. तबलजी ७५. शयन ७८. चपराक ८२. शेखी ८५. मासळी ८६. लाजाहोम ८७. आवार ८९. वजनदार ९१. माकडहाड ९२. ताठर ९३. केकाटणे ९५.ताबा ९६. दयार्णव ९८. वरद १००. आसरा १०२. यती १०४. वाजवी १०६. गडवा १०८. हवा १०९. परा ११२. गाल

# ट्रम्पने चिडून भारतावर कर लावताच रशियाकडून तेल खरेदी थांबवली?

पान १ वरून

करायला लावला . रशियाला युक्रेनचा ताबा मिळू नये यासाठी अमेरिकेने रशियाची आर्थिक कोंडी करण्यासाठी रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या भारत व इतर देशांवर खरेदी बंद करण्याचा दबाब टाकायला सुरुवात केली आहे. युक्रेन युद्धात लढणाऱ्या प्रत्येक सैनिकासाठी रशियाला १ दशलक्ष डॉलर खर्च येत आहे. रशियाला तेल विक्रीतून हा निधी उभा करावा लागत आहे. रशिया यासाठी भारत, चीन आणि ब्राझिलला होणाऱ्या तेलविक्रीवर अवलंबून आहे. या देशांवर दबाव टाकल्यास रशियाला मित्र उरणार नाही. त्यामुळे युक्रेन युद्धासाठी पैसा गोळा करणे रशियाला अशक्य होईल, असा अमेरिकेचा विचार आहे. त्यामुळेच अमेरिकेने या देशांवर आयात शुल्क लादून रशियाची कोंडी करायला सुरुवात केली आहे. त्यासाठीच भारतावर दबाव आणला आणि भारताला तेल खरेदी थांबवायला लावली असे अमेरिका सांगत आहे. जोवर भारत अधिकृत उत्तर देत नाही तोवर संभ्रम कायम राहील.

# पुण्यात कर्नल पुरोहित यांचे शोभायात्रा काढून जंगी स्वागत

पान १ वरून

पाहिले आहे. आज माझे कुटुंब माझे भव्य स्वागत करत आहे. मला या क्षणाचा खूप आनंद झाला आहे. मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट संबंधित खटल्यात एनआयए विशेष न्यायालयाने सर्व आरोपी पुराव्याअभावी निर्दोष असल्याचा निकाल दिला. यामध्ये साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली.

# दादरचा कबुतरखाना अखेर बंद! जैन समाजाचे आंदोलन

पान १ वरून

समाजाच्या काही सदस्यांनी तीव्र विरोध केला. जमावाने रस्त्यावर उतरत कारवाईला अडथळा निर्माण केला, त्यामुळे त्या दिवशीची कारवाई अर्धवट राहिली. मात्र, काल संध्याकाळी पोलीस बंदोबस्तात पालिकेने संपूर्ण कबुतरखाना ताडपत्रीने झाकत बंद केला. परिसरात धान्य टाकण्यास बंदी घालण्यात आली असून, त्याबाबत फलक लावून सूचना देण्यात आल्या आहेत. कोणी नियम तोडल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचा इशाराही पालिकेने दिला आहे. या प्रकरणावर पुढील सुनावणी ७ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे.

या कारवाईनंतर जैन समाज आक्रमक झाला आहे. आज कुलाबा येथून शेकडो जैन नागरिकांनी शांतीदूत यात्रा काढत दादर येथे आंदोलन केले. हे परिंदे नाही बोलत, पण सहनशक्ती अफाट आहे , अशा आशयाचे पोस्टर हातात घेत आंदोलक रस्त्यावर उतरले. त्यांनी फक्त पशुपक्ष्यांनाच लक्ष्य का? कबूतर हानीकारक नाहीत. चरस, गांजा, अफू आरोग्यास अधिक घातक आहेत, त्यावर कारवाई का नाही? असा सवाल उपस्थित केला. तसेच भाजपाचे आमदार आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना पत्र लिहत जनभावनेचा विचार करून योग्य तो सुवर्णमध्य शोधावा, असे आवाहन केले आहे.

# गंगा खोऱ्यात मुसळधार पाऊस पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत

पान १ वरून

नदी आज सकाळी ६ वाजताच्या सुमारास धोक्याच्या पातळीपेक्षा २० सेमीवर वाहत होती. काशीतील सर्व ८४ घाट गंगेत बुडाले आहेत. प्रयागराजमध्ये पुराचे पाणी अनेक गावांत पोहोचले आहे. इथल्या एका घरात हे पाणी पोहोचले, तेव्हा तिथे राहाणार्या पोलीस अधिकाऱ्याने गंगा पूजन केले.

हिमाचल प्रदेशची राजधानी शिमल्यामध्ये मुसळधार पावसामुळे कुमारसेन येथील शनांदमध्ये राष्ट्रीय महामार्ग-५ दरड कोसळ्यामुळे बंद झाला. या रस्त्यावरील दरड हटवत असलेला एक जेसीबी मशीन डोंगरावरून तब्बल ३०० मीटर खोल दरीत कोसळला. या अपघातात जेसीबी चालक दिनेशकुमारचा मृत्यू झाला. ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली. त्यामध्ये जेसीबी डोंगराच्या कड्या-कपारींना धडकत खाली कोसळताना दिसत आहे.

बिहारमधील सर्व ३८ जिल्ह्यांना मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. १८ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट आणि २० जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या २४ तासांत पाटणासह १३ जिल्ह्यांमध्ये पाऊस पडत आहे. पाटणामध्ये ६६६ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्येही पुढील काही दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. आसाम आणि मेघालयात अतिमुसळधार पावसासाचा रेड अलर्ट कायम आहे. पूर्व राजस्थानमध्ये जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर पश्चिम राजस्थानमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागात हलक्या ते मध्यम पावसाचा यलो अलर्ट राहील.दक्षिण भारतीय राज्यांमध्ये पावसाची तीव्रता कमी होऊ शकते, परंतु तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशातील ९ जिल्ह्यांमध्ये ४ ते ६ ऑगस्ट या काळात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. छत्तीसगडमध्येही काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

# मेघना बोर्डीकर पुन्हा वादात ग्रामसेवकाला मारण्याची भाषा

पान १ वरून

आवरा ही विनंती आहे. हा वाद वाढत असताना मेघना बोर्डीकर स्पष्टीकरण देत म्हणाल्या, बोरी येथील एका कार्यक्रमात ग्रामसेवकाने महिलांकडून पैशांची मागणी केली. त्या महिलांनी माझ्याकडे तक्रार केली. तो राग माझ्या लाडक्या बहिणींच्या हक्कासाठी होता. कृपया अर्धवट माहितीवरून दिशाभूल करणारे पोस्ट थांबवा.

# खा. निशिकांत दुबेंचे मुंबईत स्वागत करणार

पान १ वरून

आग्रही आहे, पण हिंसाचार करणारा माणूस मराठी असू शकत नाही. जो महाराष्ट्रात येईल, त्याचे आम्ही स्वागत करू. इथे कोणाशी चुकीचे वर्तन होऊ देणार नाही. भारताचा कायदा जे काही सांगतो त्यानुसारच इथला कारभार चालेल.

फडणवीसांच्या या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी जोरदार टीका केली. उबाठा नेते अंबादास दानवे म्हणाले की, हा स्पष्टपणे मराठी भाषेचा अपमान आहे. तर खासदार संजय राऊत यांनीही, मराठी माणसावर थुंकणाऱ्यांचे स्वागत करणे म्हणजे महाराष्ट्रद्रोह आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

**देशभरातील विविध शहरांना पुण्याशी जोडण्यासाठी महत्त्वाचा दुवा असलेले पुणे रेल्वे स्थानक आज १०० व्या वर्षात पदार्पण करत आहे. सर्वाधिक वर्दळीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक असलेल्या पुणे रेल्वे स्थानकात येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय असून, सर्व प्रवाशांची अविरतपणे सेवा करत स्थानक सक्षमतेने कर्तव्य बजावत आहे.**

# पुणे रेल्वे स्थानक

स्थानकाचे पहिले डिझाइन १९१५ मध्ये तयार झाले. या वास्तुचे काम पी. विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली १९२२ मध्ये सुरू झाले. तर, १९२५ मध्ये काम पूर्ण होऊन २७ जुलै १९२५ रोजी तत्कालिन गव्हर्नरने स्थानकाचे उद्घाटन केले.१८५३ मध्ये भारतात बोरीबंदर ते ठाणे दरम्यान पहिली रेल्वे धावली. त्यानंतर काही वर्षांतच पुणे-मुंबई लोहमार्ग बांधून झाला. सध्या पुणे स्थानकातून २०० हून अधिक रेल्वेगाड्यांद्वारे लाखो प्रवासी दररोज ये-जा करतात. याशिवाय लोकलदेखील धावतात. व्हिक्टोरिया टर्मिनसचा विकास करीत असतानाच लंडनमधील ग्रेट इंडियन पेनीनसुला रेल्वे कंपनीने पुणे जंक्शनचा विकास केला. ब्रिटिश लष्कराच्या दृष्टीने पुणे हे शहर महत्त्वाचे होते. त्यादृष्टीने मार्च १८५८ मध्ये खंडाळा ते पुणे दरम्यान रेल्वे लाईनचे काम पूर्ण झाले. त्यापूर्वी १८५६ मध्ये इथे रेल्वेची इमारत उभी राहिली होती. पुणे जंक्शनवरील गाड्यांची संख्या वाढू लागल्याने नवीन रेल्वे स्टेशनच्या इमारतीची गरज भासू लागली. त्यादृष्टीने १९१५ मध्ये या इमारतीचे डिझाईन तयार करण्यात आले. १९२२ मध्ये जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्यास सुरुवात करण्यात आली. १९२५ साली ही इमारत उभी झाली. त्यावेळी तिचा खर्च ५ लाख ७९ हजार ६६५ रुपये आला होता. या



नवीन रेल्वे स्टेशनच्या इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन हे खास रेल्वे गाडीने पुण्यात आले. २७ जुलै १९२५ रोजी या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. पुणे रेल्वे स्टेशनला हेरिटेज दर्जा देण्यात आला आहे. तसेच सुमारे २० वर्षांपूर्वी रेल्वे बोर्डाने मॉडेल रेल्वे स्टेशन म्हणून मान्यता देऊन गौरविले आहे. मात्र, काळाच्या ओघात पुणे रेल्वे स्टेशनकडे दुर्लक्ष झाले आहे. वाढत्या रेल्वेगाड्यांमुळे आता हे जंक्शन अपुरे पडत आहे. तरीही रेल्वेने पुणे शहरासाठी दुसरे जंक्शन विकसित करण्याकडे दुर्लक्ष केले. हडपसर, खडकी येथे रेल्वेचे जंक्शन विकसित केले जात असले तरी पुणे स्टेशनचा लौकिक आजही कायम आहे.

पुणे स्थानकातून सुटणारी डेक्कन क्वीन विशेष सुविधांसाठी प्रसिद्ध आहे. स्थानकातील सहा प्लॅटफॉर्म अपुरे पडत आहेत. स्थानकाचा विस्तार, स्थानकाच्या आवारातील सुरक्षा, अनाधिकृत प्रवेशद्वारे, पार्किंग व्यवस्था, स्थानकाच्या आवारातील वाहतूक व्यवस्था आदी काही प्रमुख आव्हाने आहेत. पुणे स्थानकाला जागतिक दर्जाचे स्थानक करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. सध्याचे रेल्वे स्थानक बहुमजली केल्यास एकाच ठिकाणाहून लोकल, मेट्रो, बस आणि अन्य वाहतूक होऊ शकते. २७ जुलै २००५ रोजी रेल्वे स्थानकाच्या वास्तूने ८१ व्या वर्षांत पदार्पण केले. त्या निमित्ताने प्रवासी संघाने स्थानकाच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या दिवशी प्रचंड पाऊस होता. मुंबईत पूर आल्याने रेल्वे वाहतूक ठप्प होती. त्यामुळे सर्व गाड्या पुण्यात थांबल्या. या शेकडो प्रवाशांना पाणी, जेवण आदी सुविधा देण्याचा हा कार्यक्रम तीन दिवस सुरू होता.

# इंडियाची ७ ऑगस्टला राहुल गांधींच्या घरी बैठक

पान १ वरून

विधानसभा निवडणुकीनंतर आम आदमी पार्टी इंडिया आघाडीमधून बाहेर पडली. ममता बॅनर्जी यांनीही इंडिया आघाडीतील काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले होते. या साऱ्या घडामोडींवर ही बैठक होत आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर सातत्याने टीका केली आहे. आपल्याकडे ठोस पुरावे असल्याचे म्हणून त्यांनी एकच खळबळ उडवून दिली आहे. या साऱ्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत सर्वच घटक पक्षांनी सहकार्य करण्याची भूमिकाही ठरवली जाऊ शकते. अमेरिकेने भारतावर लावलेल्या २५ टक्के आयातशुल्काच्या मुद्द्यावर सरकारच्या परदेश धोरणाबाबतही चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीला उद्धव ठाकरे उपस्थित राहणार असल्याची माहिती आज उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिली.

# चारनंतर पुढाऱ्यांना गणेशोत्सव दर्शन नाही! पुणे मंडळांचा निर्णय

पुणे

पुण्यात गणेशोत्सवादरम्यान दर्शनाला राज्यातील पुढार्यांनी संध्याकाळी चार वाजल्यानंतर येऊ नये, असा निर्णय आज पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांनी घेतला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांची बैठक पार पडली. शहरातील प्रमुख गणेश मंडळांचे पदाधिकारी मंडळींच्या उपस्थितीत विसर्जन मिरवणुकीसह इतर बाबींवर चर्चा झाली.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large on behalf of my client **DR. POONAM SATISH PATIL**, who intends to purchase Flat No.1002, Building No. 52, admeasuring 1340.73 sq. ft. on the 10th Floor, along with open parking space No. 494 in the Society known as "**Seawoods Estate Cooperative Housing Society Ltd**," situated at Seawoods Estates Ltd, NRI Complex, Sector Nos. 54, 56, 58(p), Nerul, Navi Mumbai-400706 from **MR. NARAYAN VAIJANATH SAMANT**, residing at C/28, Jyoti Sadan, Sitaladevi Temple Road, Mahim West, Mumbai- 400016.

In the view of all persons, banks, financial institutions, and Cidco having any claim, right, interest, or objection of whatsoever nature in respect of the Flat No.1002-whether by inheritance, share, sale, license, gift, mortgage, charge, possession, lease, assignment, lien, transfer, access, easement, encumbrances, or otherwise- are hereby requested to make the same known in writing to the undersigned Advocate at the address given below with supporting documents within 15 (Fifteen) days from the date of publication of this notice. Failing which, it will be assumed that there are no claims or objections in respect of the said Flat No.1002, and my client will complete the transaction without any reference to such claim(s), if any, and the same shall be considered as waived and abandoned.

**DESCRIPTION OF THE FLAT**

**Flat No.1002, Building No.52, 10th Floor, Type C2, Seawoods Estate Cooperative Housing Society Ltd, NRI Complex, Phase-II, admeasuring 1340.725 Sq.ft and Open Parking No.494, situated at Sector No.54, 56, 58(p), Nerul, Navi Mumbai, District Thane. Share Certificate No: 352, Share: 1756 to 1760.**

Dated this **04th August, 2025**

Sd/-
**Rugved S. Naik**
**Advocate High Court Mumbai**
C/o. M/.s Patil Gangakar & Co,
02, Old Bhanbai Niwas,
Opp. Gokul Hospital, M. G. Road,
Mulund West, Mumbai- 400080
Mobile No. 9892765919
Email Id : rsnlegal@gmail.com

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**

Municipal Bank Bhavan, 245, P. D'mello Road, Fort, Mumbai –400001.
Tel. 91-22-2261 3814/91-22-22717800/858/852
Email: mcb.itcell@mcbmumbai.com

**Tenders are invited for Renewal of Manage Engine Endpoint Central software used for Centralized Asset and Patch Management on Subscription Basis**

The Municipal Co-Operative Bank Ltd, Mumbai invites request for proposal for **Renewal of Manage Engine Endpoint Central software used for Centralized Asset and Patch Management on Subscription Basis**

Tender to be downloaded from the Bank's following Website: www.municipalbankmumbai.com Eligible vendor will be selected based on the RFP response received by the bank.

Tender to be submitted to the Bank on or before 13th August 2025 upto 5.00PM.

**Place: Mumbai** **Sd/-**
**Date: 04/08/2025** **General Manager**

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that the original share certificate No.20, distinctive Nos.96 to 100 issued by Paradise Co-Op. Hsg. Soc. Ltd., Grit Complex, Ghatkopar Mankhurd Link Road, Opp. Indian Oil Nagar, Chembur, Mumbai - 400 043 in lieu of Flat No. 504-AWing to Gautamlal Bherulal Parjapati & mrs. Meena Gautamlal parjapati has been lost, misplaced and not traceable.

The Society has received an application for transfer of the above shares in favour of Mr. Hastimal Rajmal Jain and is in the process of issue of duplicate share certificate to them.

Any person having any claim against or in respect of the said shares are hereby required to make known the same to the undersigned at the address mentioned below within 14 days from the date hereof with all documents to establish their claims, failing which such claims, if any will not be entertained and no such claim will be deemed to exist.

**Dated: 04.08.2025**
**Place : Mumbai**

**Divakar Singh(CHAIRMAN)**
**a-103, PARADISE CHSL**





नवाकाळ



## पंतप्रधानांनी घेतली राष्ट्रपतींची भेट

**नवी दिल्ली -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सदिच्छा भेट घेतली. पावसाळी अधिवेशन सुरू होण्याआधी प्रथेप्रमाणे त्यांनी राष्ट्रपतींची भेट घेतली होती. त्यानंतर पंतप्रधानांनी आज अचानक राष्ट्रपतींची भेट घेतल्याने राजधानीत चर्चेला उधाण आले होते. राष्ट्रपती भवनाच्या समाजमाध्यमावरही या भेटीचे छायाचित्र प्रसारित करण्यात आले आहे. या भेटीत कोणत्या विषयावर चर्चा झाली याविषयीची माहिती देण्यात आलेली नाही. या भेटीत उपराष्ट्रपती निवडणूक, बिहार मतदार याद्यांचे पुनरिक्षण, अमेरिकेने लावलेले आयात शुल्क अशा मुद्यांवर चर्चा झाली असावी, असा कयास वर्तवला जात आहे.



## युगेंद्र-तनिष्काचा मुंबईतील घरी साखरपुडा! पवार कुटुंब उपस्थित

■ मुंबई



**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांचे नातू आणि श्रीनिवास पवार यांचे पुत्र युगेंद्र पवार यांचा आज तनिष्का कुलकर्णी हिच्यासोबत साखरपुडा सोहळा पार पडला. मुंबईतील प्रभादेवी येथील इंडियाबुल्स इमारतीतील कुलकर्णी यांच्या घरी हा समारंभ झाला. या कौटुंबिक सोहळ्यासाठी शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे हे सहकुटुंब उपस्थित होते.

एप्रिल महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार यांचा साखरपुडा पुण्यात थाटामाटात पार पडला होता. त्यानंतर आज पवार कुटुंब पुन्हा एकत्र आले. या सोहळ्यासाठी युगेंद्र पवार यांनी गुलाबी रंगाचा सदरा आणि जॅकेट घातले होते तर तनिष्काने गुलाबी साडी नेसली होती. या सुंदर जोडीचे फोटोही आता माध्यमांवर व्हायरल होत आहेत.





राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर युगेंद्र पवार यांनी शरद पवार यांची साथ देत राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. . शरद पवार यांच्या पक्षाकडून त्यांना विधानसभेची उमेदवारीही मिळाली होती. या निवडणुकीत काका अजित पवार यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. युगेंद्र पवार हे सध्या राजकारणात सक्रिय आहेत. तर तनिष्का कुलकर्णी या उद्योगपतीच्या कन्या आहेत.

## मुंबईहून मिरजेत प्रथमच १८ फुटी गणेशमूर्तीचे आगमन

■ सांगली

**मिरजेमध्ये** श्री दत्त मंदिर गणेशोत्सव मंडळाच्या १८ फुटी गणेश मूर्तीचे आज मुंबईहून मोठ्या थाटात आगमन झाले. मिरजेच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबईत बनवलेली मूर्ती आलेली आहे. तब्बल ३६ तासांच्या प्रदीर्घ प्रवासानंतर ही मूर्ती मिरजेत दाखल झाली. मूर्ती आगमनप्रसंगी बँडपथकाच्या गजरात आणि हजारो भक्तांच्या उपस्थितीत मुखदर्शन सोहळा पार पडला. गेली ३५ वर्षे श्री दत्त मंदिर मंडळ सातत्याने गणेशोत्सव साजरा करत आहे.

यंदा मंडळाकडून 'छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक' या विषयावर आधारित देखावा सादर करण्यात येणार आहे, जो गणेशभक्तांसाठी खास आकर्षण ठरणार आहे. मात्र १८ फुटी मूर्तीचे विसर्जन कुठे करणार हा प्रश्न निर्माण होणार आहे.

## नाशिक- त्र्यंबकेश्वर रस्त्यावर साडेचार कोटी खर्चूनही खड्डे

■ नाशिक

**नाशिक-त्र्यंबकेश्वर** रस्ता चार महिन्यांपूर्वी सुमारे साडेचार कोटी रुपये खर्चून नव्याने तयार करण्यात आला. पण पहिल्या पावसात या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्ता वाहूनही गेला आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर हे १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. गोदावरी नदीचे उगमस्थान आणि सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हे तीर्थक्षेत्र देशभरातून हजारो भाविकांना आकर्षित करते. विशेषतः श्रावण महिन्यात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढते. पण नाशिक ते त्र्यंबकदरम्यानच्या रस्त्याची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. रस्त्यावरील या खड्ड्यांमुळे वाहन चालकांना प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. अवघ्या ३० किमीच्या प्रवासासाठी तब्बल एक तासाचा कालावधी लागत आहे. पिंपळगाव बहुला ते पहिने वाडी फाट्यापर्यंतच्या परिसरात अनेक अपघात झाले असून, स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदन दिले. पण अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला.

## विरारमध्ये ट्रेन धडकेत ६५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

■ वसई

**मुंबईजवळील** विरार रेल्वे स्थानकाच्या नारंगी फाटक परिसरात आज सकाळी जयपूरहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या जयपूर-बांद्रा एक्स्प्रेसने ६५ वर्षीय वृद्ध व्यक्तीस धडक दिली. यामध्ये वृद्धाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली. या अपघातानंतर एक्स्प्रेस ट्रेन काही काळ थांबवली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला.

## माझ्या दैवताला काही बोलू नका गोट्या गित्तेची आव्हाडांना धमकी

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर सातत्याने आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गंभीर आरोप केले आहेत .यावरुन कराडचा निकटवर्ती गोट्या गित्तेने आव्हाड यांना व्हिडिओ जारी करून धमकी दिली.

गोट्या गित्तेने धमकी देत म्हटले की, जितेंद्र आव्हाड तुमचे माझ्याकडे कॉल रेकॉर्डिंग आहेत. तुम्ही वंजारी समाजाचे नाही आहात. जर तुम्ही पुन्हा वाल्मिक कराड बद्दल काही बोललात तर ते महागात पडेल. मी लहान माणूस आहे. मला फाशी झाली तरी चालेल, पण माझ्या दैवताला काही बोलू नका. तुम्ही धनंजय मुंडे यांना टार्गेट करत आहात. परळीतील कुणालाही विचारा अण्णा म्हणजे कोण ते सर्व सांगतील. मी आत्महत्या केली तर त्याला तुम्ही जबाबदार असाल. या धमकीवर आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, गोट्या गित्ते हा अट्टल गुन्हेगार आहे. त्याचे बंदूक दाखवत असल्याचे व्हिडिओ अनेकदा व्हायरल झाले आहेत. अशा गुन्हेगारांच्या धमक्यांना मी घाबरत नाही. त्याने याआधीही माझ्याबद्दल अर्वाच्य भाषा वापरली होती.यांना एवढा माज कुठून येतो ? मी वंजारी आहे की नाही याचे प्रमाणपत्र मला त्याच्याकडून घ्यायचे नाही. मी खानदानी वंजारी आहे.

## स्पाईसजेटच्या कर्मचाऱ्यांना प्रवाशाकडून जबर मारहाण

■ श्रीनगर

**श्रीनगर** विमानतळावर स्पाईसजेटच्या चार कर्मचाऱ्यांना एका प्रवाशाने जबर मारहाण केल्याची आज घटना घडली. हा प्रवासी सैन्यातील अधिकारी असल्याचे सांगण्यात येत असून या मारहाणीचा व्हिडिओ समाजमाध्यमावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

हा प्रवासी स्पाईसजेटच्या विमानाने दिल्लीला जात होता. त्याच्याकडे प्रत्येकी १६ किलोच्या दोन बॅगा होत्या. विमानातून सामान नेण्याच्या मर्यादेपेक्षा त्याच्या बॅगांचे वजन अधिक असल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला अतिरिक्त पैसे भरायला सांगितले. त्यानंतर कर्मचारी व त्याच्यात बाचाबाची झाली. त्यानंतर या प्रवाशाने चार कर्मचाऱ्यांना मारहाण केली. यात एकाच्या कंबरेचे हाड मोडले असून एका कर्मचाऱ्याचा जबडा फाटला असल्याचे स्पाईसजेटने म्हटले आहे. या प्रवाशावर हवाई प्रवास प्रतिबंध लावण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

## माओवाद्यांच्या स्फोटात रेल्वे ट्रॅकमनचा मृत्यू

■ रांची

**ओडिशा** व झारखंडच्या सीमाभागातील रेल्वेरुळाची तपासणी करत असताना माओवाद्यांनी केलेल्या स्फोटात एका रेल्वे ट्रॅकमनचा मृत्यू झाला असून एकजण जखमी झाला आहे. जखमी रेल्वे कर्मचाऱ्याला उपचारासाठी रुरकेला इथे पाठवण्यात आले आहे. ओडिशा व झारखंडच्या सीमाभागातील चक्रधरपूर या भागात आज माओवाद्यांनी बंदची हाक दिली होती. त्यांनी रेल्वे रुळावरदेखील बंदचे फलक लावले होते. दोन रेल्वे ट्रॅकमन हे रुळ दुरुस्तीचे काम करत असताना अचानक माओवाद्यांनी स्फोट घडवला. त्यात एकाचा मृत्यू झाला. रेल्वे सुरक्षा दलाने आधी या रेल्वेमार्गावर तपासणी करायला हवी होती. मात्र अधिकाऱ्यांनी याची शहानिशा न करता कर्मचाऱ्यांना दुरुस्तीसाठी पाठवण्यात आले. त्याबद्दल कर्मचाऱ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

## सहप्रवाशाच्या श्रीमुखात भडकावणाऱ्याला प्रवासबंदी

■ मुंबई

**मुंबई** ते कोलकाता जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात घाबरलेल्या एका प्रवाशाच्या श्रीमुखात भडकावणाऱ्या सहप्रवाशाला यापुढे इंडिगोच्या सर्व विमानांमध्ये प्रवास करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. इंडिगो विमान कंपनीने एक्स पोस्टद्वारे ही माहिती दिली असली तरी या प्रवाशाचे नाव मात्र उघड केलेले नाही.

इंडिगोच्या कोलकात्याला जाणाऱ्या एका विमानातील ३२ वर्षीय हसन मुजुमदार हा प्रवासी ऐन विमान उड्डाणाच्या वेळी घाबरला. तो अस्वस्थ झाल्यानंतर विमानातील हवाई सुंदरींनी त्याला कसेबसे शांत केले. त्याला जागेवर घेऊन जात असताना दुसऱ्या एका मध्यमवयीन प्रवाशाने त्याच्या श्रीमुखात



भडकावली. त्यानंतर इतर प्रवाशांनीही त्याला चांगलेच सुनावले. इंडिगोने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, विमान प्रवासात अशा प्रकारचे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. त्यामुळे त्याला यापुढे इंडिगोच्या कोणत्याही विमानात प्रवास करता येणार नाही. श्रीमुखात भडकावणाऱ्या व्यक्तीला कोलकाता विमानतळावर अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान विमान उड्डाणाच्या वेळी घाबरलेला प्रवासी हुसेन मुजुमदार हा कोलकाता विमानतळावरून बेपत्ता झाला होता. त्याला कोलकाता ते सिलचर विमानप्रवास करायचा होता. मात्र त्याने हा प्रवास टाळला व तो तिथून ८०० किमी दूर आसामच्या बारपेटा येथे आढळला. तिथून ४०० किमी दूर असलेल्या सिलचरला तो रेल्वेने गेला. रेल्वे स्थानकावरही तो अस्वस्थ दिसत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

## महादेव मुंडे हत्या प्रकरण एसआयटी प्रमुख बीडमध्ये

■ बीड

**परळीतील** व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाचे (एसआयटी) प्रमुख आयपीएस पंकज कुमावत आज बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाले. या वेळी त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख शिवाजी बंटेवाड यांच्यासोबत आतापर्यंतच्या तपासासंदर्भात चर्चा केली.

या प्रकरणात तब्बल २१ महिन्यांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार चार दिवसांपूर्वी विशेष तपास पथक तयार करण्यात आले आहे. पंकज कुमावत यांच्या नेतृत्वाखाली तपासाला गती मिळेल अशी आशा मुंडे कुटुंबियांना आहे. मुख्य आरोपी गोट्या गित्ते याला अटक करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दोन दिवसांपूर्वी मुंबईला गेले होते.

## दिल्लीत १० वर्षांच्या मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** नांगलोई परिसरात एका १० वर्षांच्या मुलाचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा मुलगा एमसीडी शाळेत शिक्षण घेत होता आणि त्याला मोबाईल गेमचे प्रचंड व्यसन होते. तो अंबिका विहार कॉलनीमध्ये आपल्या पालकांसोबत राहत होता. दोघेही पालक नोकरी करणारे आहेत. मुलगा दररोज सुमारे १०-११ तास मोबाईलवर वेळ घालवत असे.

## खलिस्तानविरोधी लढ्यातील सुखी चहल यांचा गूढ मृत्यू

■ वॉशिंग्टन



**खलिस्तानविरोधी** लढ्यातील कार्यकर्ते सुखी चहल यांचे अमेरिकेत गूढरित्या निधन झाले. जेवणानंतर अचानक त्यांचे निधन झाल्याने संशय निर्माण झाला आहे.

अमेरिकत स्थायिक असलेले उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सुखी चहल एका परिचिताच्या घरी जेवायला गेले होते. कोणताही त्रास नसलेल्या चहल यांची तब्येत जेवणानंतर ढासळली व त्यातच त्यांचा मृत्यू झाला. सुखी चहल हे, द खालसा टुडे या माध्यमाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांनी अनेकदा परदेशात सक्रीय असलेल्या खलिस्तानी गटांचा निषेध केला होता. त्यामुळे खलिस्तानवाद्यांकडून अनेकदा त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या होत्या. १७ ऑगस्टला वॉशिंग्टन इथे होणाऱ्या खलिस्तान वाद्यांच्या कार्यक्रमाच्या आधीच त्यांचा मृत्यू झाल्याने संशय अधिक बळावला आहे. अमेरिकन पोलिसांनी त्यांच्या मृत्यूचा तपास सुरु केला असून शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होईल असे म्हटले आहे.

## जरांगे बचावले लिफ्ट कोसळली

■ बीड

**बीडमध्ये** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील लिफ्टमधून जात असताना लिफ्टचा अपघात झाला. आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारास जरांगे एका रुग्णालयात रुग्णाला भेटण्यासाठी दुसऱ्या मजल्यावर लिफ्टने जात होते. लिफ्ट पहिल्या मजल्यावर पोहोचताच अचानक बंद पडून जमिनीवर कोसळली. लिफ्ट कोसळल्याने मोठा आवाज झाला. त्यामुळे रुग्णालयात एकच खळबळ उडाली. त्यानंतर जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लिफ्टचे दरवाजे तोडून बाहेर काढण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही.

## पुणे पोर्शे कार अपघात प्रकरण अंत्यसंस्कारासाठी आरोपीला जामीन

■ मुंबई

**पुण्यातील** पोर्शे कार अपघात प्रकरणातील आरोपी सूद याच्या वडिलांचे निधन झाल्याने वडिलांवर अंत्यसंस्कारासाठी त्याला मुंबई उच्च न्यायालयाने तीन दिवसांचा तात्पुरता जामीन मंजूर केला आहे. न्या. अश्विन भोबे यांनी आदित्य अविनाश सूद याला २ ते ५ ऑगस्टपर्यंत जामीन मंजूर केला.

गेल्या वर्षी १९ मे रोजी पुण्यातील कल्याणीनगर भागात पोर्शे कारने मोटरसायकलस्वारील दोन आयटी व्यावसायिकांना चिरडले होते.या गाडीच्या अल्पवयीन चालकाची मद्य चाचणी निगेटिव्ह ठरविण्यासाठी त्याच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. हे रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी आदित्य सूदसह १० जणांना अटक केली होती. आरोपी आदित्य सूद तर्फे त्याचे वकील आबिद मुलाणी यांनी न्यायालयात विनंती अर्ज दाखल करून वडिलांच्या अंत्यसंस्कारात हजर राहण्यासाठी तीन दिवसांचा अंतरिम जामीन मिळावा ,अशी मागणी केली होती. उच्च न्यायालयाने सूद याला २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

## यवतमध्ये तिसऱ्या दिवशीही जमावबंदी

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात व्हॉट्सपवरील आक्षेपार्ह पोस्टमुळे उसळलेल्या तणावानंतर गावात सलग तिसऱ्या दिवशी जमावबंदी होती. दगडफेक, जाळपोळ, धार्मिक स्थळांची तोडफोड आणि वाहनांना आग लावण्याच्या प्रकारानंतर पोलिसांनी १५ जणांना अटक केली. त्यांना ६ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

यवत गावातील एका तरुणाने १ ऑगस्ट रोजी व्हॉट्सपवर आक्षेपार्ह पोस्ट केल्यामुळे गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी १२ वाजताच्या सुमारास आठवडी बाजार बंद करण्यात आला. काही वेळातच जमाव आक्रमक झाला. जमावाने दगडफेक, दुचाकींना आग लावली आणि धार्मिक स्थळांची तोडफोड केली. या प्रकरणात आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या सय्यद नावाच्या व्यक्तीसह एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. तर १५ जणांना दंगल केल्या प्रकरणी अटक केली आहे. इतर लोकांच्या शोधासाठी सहा पथके रवाना करण्यात आली आहेत.

## रामदास कांबळे यांचा शिंदेसेनेत प्रवेश उबाठा कार्यकर्त्यांकडून फोटोला काळे

■ मुंबई

**शिवसेना** उबाठाचे प्रतीक्षानगरचे माजी नगरसेवक रामदास कांबळे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. परंतु या पक्षप्रवेशानंतर उबाठा कार्यकर्त्यांनी आक्रमक होऊन कांबळेंच्या फोटो आणि बॅनरला काळे फासले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, जनतेच्या विकासासाठी रामदास कांबळे यांनी पक्षात येण्याचा निर्णय घेतला. पक्षप्रवेशावेळी त्यांनी कोणत्याही अटी ठेवल्या नाहीत. त्यांना शिवसेना शिंदे गटाच्या युवा सेनेच्या कार्यकारीणीमध्ये घेत आहोत. आपल्याला सर्वांना सोबत घेऊन काम करायचे.

## विसापूर किल्ल्यावरून पडून पर्यटकाचा मृत्यू

■ पुणे

**मावळ** तालुक्यातील प्रसिद्ध विसापूर किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या अब्राहम सिनशेप ( २९) या पर्यटकाचा पाय घसरून खोल दरीत पडून मृत्यू झाला. अब्राहम हा मूळचा केरळचा होता. तो सध्या पुण्यातील रामवाडी परिसरात राहत होता. पुण्यात ख्रिश्चन समाजातील फादर होण्याचे शिक्षण तो घेत होता. काल सकाळी तो आपल्या दहा मित्रांसोबत विसापूर किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेला होता. त्यावेळी भाजे धबधब्याजवळील पायवाटेवरून जात असताना त्याचा तोल जाऊन तो खोल दरीत पडला. खाली पडताना डोक्यावर गंभीर इजा झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर मावळ तालुक्यातील शिवदुर्ग रेस्क्यू टीमने दरीत कोसळलेला त्याचा मृतदेह शोधून बाहेर काढला.

## सोलापुरात शिंदे युवासेनेच्या २१ पदाधिकाऱ्यांचा राजीनामा

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यात शिवसेना शिंदे युवासेनेच्या २१ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. यामुळे जिल्ह्यात शिंदे गटाला चार दिवसांत दुसरा धक्का बसला आहे. यापूर्वी माढा तालुक्यात माजी मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत यांनी पक्षाच्या निर्णय प्रक्रियेतून डावलल्यामुळे जिल्हासंपर्क प्रमुख पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर जिल्हा समन्वयक आणि माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्यासह ११ जणांचे राजीनामे पक्षाकडे दिले होते.



आज युवा सेनेतील २१ पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले.

शिवसेना संपर्क प्रमुख शिवाजी सावंत यांच्या समर्थनार्थ या युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याचे सांगण्यात आले. लोकसभा संपर्क प्रमुख संजय साठे यांच्याविरोधात सोलापूर शिवसेना शिंदे गटातील पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. साठे यांनी शिवाजी सावंत यांना विचारात न घेता मतदारसंघात पदाधिकाऱ्यांची निवड केल्याची युवासेनेच्या पदाधिकार्यांची तक्रार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या तक्रारीची दखल न घेतल्याने हे पदाधिकारी नाराज आहेत.